संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १९७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. १२ जुलै २०२६




# माऊलींच्या नामघोषाने दिवे घाट दुमदुमला!

## लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्याचे पुरंदरमध्ये स्वागत

"या या दिव्याच्या घाटात, माऊली चालती थाटात..." या अजरामर अभंगातील ओळी शनिवारी प्रत्यक्ष अनुभवायला मिळाल्या. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा लाखो वारकऱ्यांच्या "माऊली... माऊली..." नामघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि अखंड हरिनामाच्या निनादात दिवे घाटाची अवघड चढण यशस्वीपणे पार करत सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पुरंदर तालुक्यात दाखल झाला. घाटमाथ्यावर उपस्थित हजारो भाविकांनी हा अविस्मरणीय भक्तिसोहळा डोळ्यांत साठवला. पुरंदरकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पालखी रथाचे भव्य स्वागत करत वारी परंपरेला मानवंदना दिली.

सासवड (दै. संध्या) : ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे स्वागत करण्यासाठी पुरंदर तालुक्यातील गावागावांतून हजारो भाविक सकाळपासूनच दिवे घाट परिसरात जमा झाले होते. वडकी येथील विसाव्याच्या ठिकाणी सुमारे पाऊण तास विश्रांती घेतल्यानंतर सायंकाळी पाचच्या सुमारास पालखीने दिवे घाट चढण्यास सुरुवात केली. टाळ-मृदंग, वीणा, चिपळ्या आणि हरिनामाच्या अखंड गजरात वारकरी उत्साहाने घाट चढत होते. सुमारे दीड तासांचा प्रवास पूर्ण करून पालखीने सायंकाळी सात वाजता घाटमाथा गाठला आणि झेंडेवाडी येथील विसाव्याच्या ठिकाणी काही काळ विश्रांती घेतली.

घाटाच्या अंतिम टप्प्यावर पालखी पुरंदरच्या हद्दीत प्रवेश करताच "माऊली... माऊली..."च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी टाळ्यांच्या गजरात, फुलांच्या वर्षावात आणि भावपूर्ण स्वागताने पालखी रथाचे स्वागत केले. भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा संगम अनुभवण्यासाठी हजारो नागरिक घाटमाथ्यावर तासनतास थांबले होते. अनेकांनी मोबाईलमध्ये हा नयनरम्य सोहळा टिपला, तर अनेकांनी "याची देही, याची डोळा" हा अविस्मरणीय क्षण अनुभवला.

यावेळी पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ दिगंबर दुर्गाडे, जिल्हा परिषद सदस्य रुपाली झेंडे, पुरंदर पंचायत समिती सभापती अमित झेंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, ग्रामीण पोलीस अधिक्षक संदिप गिल, माजी सनदी अधिकारी संभाजी झेंडे, बाबाराजे जाधवराव, झेंडेवाडी सरपंच अमर झेंडे, उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रकुमार गौड, तहसीलदार विक्रम राजपूत , यांनी सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे मावली खटाटे शिवाजी, अजित गोळे, सोनाली झेंडे, पुनम झेंडे कौशल्या झेंडे, ॲड नितीन कुंजीर कौशल्या झेंडे पोलीस पाटील सारीका झेंडे, उपस्थित होते.

झेंडेवाडीनंतर काळेवाडी, ढुमेवाडी, दिवे, पवारवाडी आदी गावांमध्ये ग्रामस्थांनी पालखीचे उत्साहात स्वागत करत माऊलींचे दर्शन घेतले. पालखी रथाला मानाच्या बैलजोडीबरोबर स्थानिक शेतकऱ्यांच्या बैलजोड्यांनीही रथ ओढण्याचा मान मिळाला. ही परंपरा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

वारी म्हणजे केवळ धार्मिक यात्रा नसून सेवा, समता आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवणारी परंपरा असल्याचे चित्र संपूर्ण मार्गावर दिसून आले. विविध सामाजिक संस्था, ग्रामस्थ आणि दानशूर व्यक्तींनी वारकऱ्यांसाठी ठिकठिकाणी पिण्याचे पाणी, चहा, फराळ, वैद्यकीय मदत आणि औषधांची व्यवस्था केली होती. अनेक तरुण आणि विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने वाहतूक नियंत्रण, वारकऱ्यांना मार्गदर्शन आणि सेवा कार्यात सहभागी झाले होते. त्यामुळे संपूर्ण मार्गावर सेवाभावाचे प्रेरणादायी दर्शन घडले. यंदाच्या वारीत तरुणांचा सहभाग विशेष लक्षणीय ठरला. पारंपरिक वेशभूषेत, हातात टाळ-चिपळ्या आणि मुखी विठ्ठलनाम घेत हजारो युवक-युवती पालखीसोबत चालताना दिसत होते. आधुनिकतेच्या युगातही वारी परंपरेबद्दलची निष्ठा आणि अध्यात्माविषयीची आस्था नव्या पिढीत अधिक दृढ होत असल्याचे या सोहळ्याने अधोरेखित केले.



दिवे घाटातील हा भक्तिमय सोहळा म्हणजे महाराष्ट्राच्या संतपरंपरेचे, वारकरी संप्रदायाच्या अखंड श्रद्धेचे आणि सामाजिक ऐक्याचे जिवंत दर्शन ठरले. लाखो वारकऱ्यांच्या नामघोषाने दुमदुमलेला दिवे घाट आणि पुरंदरमध्ये झालेल्या पालखीच्या भव्य स्वागताने आषाढी वारीचा अविस्मरणीय अध्याय पुन्हा एकदा इतिहासात नोंदवला गेला.

---

## शेतकरी कर्जमाफी, बोगस बियाणे आणि मोशी दुर्घटनेवरही केले मोठे भाष्य

# दिल्लीला जाणार का? प्रश्नावर फडणवीसांचे मिश्किल उत्तर!

**नागपूर (दै. संध्या)**

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विरोधकांकडून सुरू असलेल्या 'दिल्लीवारीच्या' चर्चांना मिश्किल उत्तर दिले. यासोबतच राज्यातील पावसाची स्थिती, ऐतिहासिक शेतकरी कर्जमाफी, बोगस सोयाबीन बियाणे, नागपुरातील ॲग्रो कन्व्हेन्शन सेंटर आणि मोशी इमारत दुर्घटना अशा विविध महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी सविस्तर माहिती दिली.



गेल्या काही दिवसांपासून देवेंद्र फडणवीस हे दिल्लीच्या राजकारणात जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. शिवसेना (ठाकरे गट) नेते संजय राऊत यांनी "फडणवीसांना दिल्लीत मोठी जबाबदारी दिली जाईल आणि त्यांच्या जागी चंद्रशेखर बावनकुळे मुख्यमंत्री होतील," असा दावा केला होता. आमदार आदित्य ठाकरे यांनीही हे फडणवीसांचे शेवटचे अधिवेशन असल्याचे भाकीत वर्तवले होते. या वेगवान चर्चांच्या पार्श्वभूमीवर पत्रकारांनी थेट विचारले की, “तुम्ही देशाचे नेतृत्व करणार, दिल्लीला जाणार का?” यावर गालातल्या गालात हसत फडणवीस यांनी अत्यंत मिश्किलपणे उत्तर दिले, "मी परवाच गेलो होतो दिल्लीला." या एका वाक्यात त्यांनी थेट उत्तर देणे टाळत विरोधकांच्या चर्चांना बगल दिली.

अधिवेशनात जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीवर बोलताना फडणवीस म्हणाले की, ही महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी आहे. यापूर्वीच्या 'महात्मा ज्योतिराव फुले कर्जमाफी योजनेत' ज्यांना माफी मिळाली होती, पण जे आता पुन्हा थकबाकीदार झाले आहेत, त्यांना सुरुवातीला 50 हजार रुपयांचा दिलासा देण्याचा विचार होता. मात्र, सत्ताधारी आमदारांच्या आग्रहास्तव 50 हजारांची अट रद्द करून सरसकट दोन लाखांपर्यंतची कर्जमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी कौतुक केले होते. त्यावर बोलताना, "मी त्यांचे आभार ऐकले नाहीत, पण त्यांनी कौतुक केले असेल तर मी त्यांचा आभारी आहे," अशी प्रतिक्रिया फडणवीस यांनी दिली.

विदर्भासह राज्यात बोगस सोयाबीन बियाणांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याच्या तक्रारींवर सरकारने कठोर पावले उचलली आहेत. फडणवीस यांनी सांगितले की, कमी उगवण क्षमता असलेल्या बियाण्यांवर तत्काळ कारवाई सुरू करण्यात आली आहे. तब्बल 5 हजार नमुने तपासणीसाठी घेतले असून, त्यापैकी 300 नमुने फेल ठरले आहेत. दोषी कंपन्यांवर केवळ परवाने रद्द करण्याचीच नव्हे, तर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यापर्यंतची कारवाई केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीवरही त्यांनी भाष्य केले. “विदर्भामध्ये 10 दिवसांचा 'ड्राय स्पेल' आला असून पावसाची 19% तूट आहे. 'अल निनो' संकटामुळे पावसात तूट आणि दोन पावसांच्या स्पेलमध्ये अंतर राहणार आहे, हे आम्ही आधीच सांगितले होते.” शेतकऱ्यांनी सरकारच्या सल्ल्यानुसार सुरुवातीची धूळपेरणी टाळून उशिरा पेरण्या केल्या, ही चांगली बाब आहे. आता विहिरी आणि इतर सिंचन व्यवस्थांचा वापर करून 'प्रोटेक्टिव्ह इरिगेशन' दिल्यास पिके वाचवता येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नागपुरातील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात महाराष्ट्र शासनाच्या वतीने देशातील अत्यंत आधुनिक असे 'ॲग्रो कन्व्हेन्शन सेंटर' उभारले जात असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. हे देशातील सर्वात मोठे 'कॉलम फ्री' हॉल असलेले कन्व्हेन्शन सेंटर असेल. येथे शेतकऱ्यांची प्रदर्शने, कृषी परिषदा आणि विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातील.

---

# मंदिरावर टीका करणाऱ्यांनी रामरक्षा म्हणणं हा मोठा विनोद!

## उद्धव ठाकरेंवर शिंदेंची बोचरी टीका, कर्जमाफीवर शरद पवारांनाही कौतुक असल्याचा दावा



**नागपूर (दै. संध्या)**

### शिवसेनेत नव्यांना संधी देण्यामागे पक्षवाढीचे धोरण

शिवसेनेत नव्याने येणाऱ्या नेत्यांना प्राधान्य दिले जात असल्याच्या प्रश्नावर शिंदे म्हणाले की, पक्षवाढीसाठी काही राजकीय समीकरणे जुळवावी लागतात. "पक्ष वाढला तर सर्व कार्यकर्त्यांना संधी मिळते. शिवसेना दिलेला शब्द पाळणारा आणि कमिटमेंटला जागणारा पक्ष आहे. एकनाथ शिंदे यांच्यावर लोकांचा विश्वास असल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोक शिवसेनेत प्रवेश करत आहेत," असे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना शेतकरी कर्जमाफी, उद्धव ठाकरे, शरद पवार, शिवसेना संघटनबांधणी आणि विरोधकांच्या भूमिकेवर भाष्य केले. शेतकरी कर्जमाफीतील अटी हटवण्याचा निर्णय हा लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणारा असल्याचे सांगतानाच उद्धव ठाकरे यांच्या प्रस्तावित 'रामरक्षा' पठणावर त्यांनी जोरदार टीका केली.

शेतकरी कर्जमाफीबाबत बोलताना शिंदे म्हणाले की, महायुती सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरील उत्तरात कर्जमाफी योजनेतील अटी हटवण्याची घोषणा केली असून त्यामुळे दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज असलेल्या लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी शरद पवार यांनीही कर्जमाफीच्या निर्णयाचे कौतुक केल्याचा उल्लेख करत शिंदे म्हणाले, "शरद पवार हे ज्येष्ठ नेते आहेत. चांगल्या निर्णयाला चांगले म्हणण्याची त्यांची वृत्ती आहे. मात्र काही विरोधी पक्षनेते सरकार कितीही चांगले काम करत असले तरी टीका करण्याचीच भूमिका घेतात. शरद पवारांनी त्यांना योग्य उत्तर दिले आहे."

उद्धव ठाकरे पुढील आठवड्यात नागपुरात रामरक्षा पठण करणार असल्याच्या प्रश्नावर शिंदे यांनी त्यांच्यावर निशाणा साधला. "जनतेने शिक्षा केल्यानंतर त्यांना आता रामरक्षा आठवली. हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे," असा टोला त्यांनी लगावला.

"हिंदुत्व हे टी-शर्ट बदलावा तसे बदलता येत नाही. ते मनातून असावे लागते. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार ज्यावेळी सोडले, त्याचवेळी त्यांचे हिंदुत्व संपले. अयोध्येतील राम मंदिरावर टीका करणाऱ्यांनी आता रामरक्षा म्हणणे हा मोठा विनोद आहे," अशी टीका त्यांनी केली.

तसेच, "ज्यांनी हनुमान चालीसा म्हणणाऱ्यांना जेलमध्ये टाकले, त्यांनी आता रामरक्षा म्हणण्याची भाषा करणे हे ढोंग आहे," असेही शिंदे म्हणाले.

मनसे पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या सिद्धिविनायक मंदिरातील कथित गैरव्यवहाराच्या मुद्द्यावर बोलताना शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. "कोणताही विषय असो, चौकशी होणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर बोलताना शिंदे म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका स्पष्ट आहे – 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा.' चुकीचे काम करणाऱ्यांना जेलमध्ये जावे लागेल, असा कोट्यवधी रामभक्तांचा विश्वास आहे."

## संपादकीय

# भारताला वारीची कौतुकास्पद परंपरा

भारत हा संत, संस्कृती, अध्यात्म आणि भक्तीचा देश म्हणून जगभर ओळखला जातो. या भूमीवर अनेक धार्मिक परंपरा शतकानुशतके अखंडपणे जोपासल्या गेल्या आहेत. त्यापैकी महाराष्ट्राची वारी परंपरा ही केवळ धार्मिक यात्रा नसून सामाजिक समता, मानवता, शिस्त, सेवा आणि राष्ट्रीय एकात्मतेचे जिवंत प्रतीक आहे. त्यामुळेच भारताला लाभलेली ही वारीची परंपरा संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आणि कौतुकास्पद ठरते. आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने लाखो वारकरी संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसोबत पायी चालत पंढरपूरातील विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी जातात. शेकडो किलोमीटरचा हा प्रवास कोणत्याही बळजबरीशिवाय, केवळ श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक भावनेने पूर्ण केला जातो. या यात्रेत लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण उत्साहाने सहभागी होतात.

वारीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे समता. येथे श्रीमंत-गरीब, जात-पात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा सामाजिक दर्जा यांना कोणतेही महत्त्व नसते. सर्व वारकरी एकाच रांगेत चालतात, एकत्र जेवतात, भजन-कीर्तन करतात आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषात विठ्ठलनामाचा गजर करतात. संतांनी दिलेला "मानवतेचा धर्म" वारीत प्रत्यक्ष अनुभवायला मिळतो. वारी ही शिस्तीची देखील अनोखी शाळा आहे. लाखो लोकांचा जनसमुदाय असूनही दिंडी व्यवस्था, मुक्काम, वेळेचे नियोजन, स्वच्छता आणि परस्पर सहकार्य यामुळे ही यात्रा सुरळीत पार पडते. कोणत्याही मोठ्या सरकारी यंत्रणेपेक्षा वारकऱ्यांची स्वयंशिस्त अधिक प्रभावी असल्याचे अनेकदा पाहायला मिळते. त्यामुळे व्यवस्थापन आणि संघटनशक्तीचा आदर्श म्हणूनही वारीकडे पाहिले जाते. वारकरी संप्रदायाने समाजाला सेवा, त्याग, सहकार्य आणि पर्यावरण संवर्धनाचेही धडे दिले आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था आणि तरुण मंडळे वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय सेवा, पिण्याचे पाणी, अन्नदान, स्वच्छता आणि वृक्षारोपणाचे उपक्रम राबवतात. त्यामुळे वारी ही केवळ धार्मिक परंपरा न राहता सामाजिक परिवर्तनाची चळवळ बनली आहे. आजच्या धावपळीच्या आणि तणावग्रस्त जीवनात वारी मनाला शांतता, संयम आणि सकारात्मक ऊर्जा देणारी ठरते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही लाखो लोक श्रद्धेने पायी चालत विठ्ठलाच्या भेटीस जातात, ही बाब जगाला आश्चर्यचकित करणारी आहे.



अनेक देशांतील अभ्यासक आणि पर्यटक वारीचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रात येतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर, शांततेत आणि शिस्तीत पार पडणाऱ्या यात्रांचे उदाहरण जगात फारच कमी आहे. भारतातील विविध धार्मिक परंपरांमध्ये वारीचे स्थान अतिशय मानाचे आहे. संतांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक समता, लोकसंस्कृतीचे जतन आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणारी ही परंपरा भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा अमूल्य ठेवा आहे.

## गुरु वचन

### आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मनुष्याच्या विकासात आई–वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात.

जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु–संत व महापुरुषांनी आई–वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई–वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई–वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई–वडिलांचा सांभाळ किंवा पालन–पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई–वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई–वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो.

बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई–वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई–वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई–वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई–वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते.

बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई–वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई–वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई–वडिलांची सेवा प्रथम होती.

प्राचीन भारतात आई–वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार–प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई–वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई–वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती. चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते. त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे ८० हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

एकेदिवशी एक शिकारी, शिकारीच्या शोधात बोधिसत्व आई व छोट्या भावासह राहत असलेल्या झाडाखाली आला. शिकारीचे लक्ष त्याच्या आईकडे गेले व त्याने आईच्या दिशेने बाण साधला. मातृभक्त नन्दिय शिकारीसमोर येऊन म्हणाला की, हवं तर मला मार पण माझ्या आईला सोड. निर्दयी शिकारीने बोधिसत्वाची हत्या केली. त्यानंतर शिकारीने छोटा भाऊ व आईला मारले.

आई, बोधिसत्व व भावाच्या हत्येच्या महापापामुळे त्यावेळी भयंकर वादळ आले, ज्यात शिकारीचे संपूर्ण कुटूंब मरण पावले. नंतर तुटलेल्या घराच्या खांबाखाली दबून तो पापी शिकारी सुद्धा मरण पावला.

आज काही लोक आपल्या आई–वडिलांना घराबाहेर काढतात. काही त्यांची संपत्ती बळकावून त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. पण त्यांना हे माहित नसते की, त्यांचे मुलं भविष्यात त्यांच्यासोबत असाच व्यवहार करतील.

## पंचांग

| पंचांग | नक्षत्र:मृगशिर्षा |
|---|---|
| १२ जुलै २०२६ | २९:४१:२४+ |
| रविवार | योग:वृद्धि २०:०५:३३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:गर १२:१८:४५ |
| निज ज्येष्ठशके | करण:वणिज २२:३०:१२ |
| संवत्– १९४८ | सूर्य:मिथुन |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मिथुन१९:०६:०९ |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– निज ज्येष्ठ | मुस्लिम मास – मोहरम |
| ऋतु– सौर वर्षा | तारीख – २६ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:त्रयोदशी २२:३०:१२ | प्रदोष |
| नक्षत्र:रोहिणी ०८:२८:५४ | शिवरात्री |

## दैं. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १००८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | | | 8 | | 2 | 5 | 7 |
| 1 | | | | 5 | | 8 | | |
| | 5 | 8 | | 6 | | | | 4 |
| | | | | 9 | 6 | | | 3 |
| | 6 | | | 3 | | | 9 | |
| 7 | | | 1 | 2 | | | | |
| 8 | | | | 4 | | 9 | 1 | |
| | | 5 | | 7 | | | | 8 |
| 2 | 9 | 4 | | 1 | | | | 6 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १००७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 9 | 7 | 1 | 3 | 2 | 5 | 8 | 4 |
| 5 | 3 | 1 | 7 | 8 | 4 | 9 | 2 | 6 |
| 4 | 8 | 2 | 9 | 6 | 5 | 3 | 7 | 1 |
| 3 | 1 | 5 | 6 | 2 | 9 | 7 | 4 | 8 |
| 7 | 2 | 9 | 8 | 4 | 3 | 1 | 6 | 5 |
| 8 | 4 | 6 | 5 | 7 | 1 | 2 | 3 | 9 |
| 9 | 7 | 4 | 2 | 1 | 6 | 8 | 5 | 3 |
| 1 | 6 | 8 | 3 | 5 | 7 | 4 | 9 | 2 |
| 2 | 5 | 3 | 4 | 9 | 8 | 6 | 1 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११९१ – तिसरी क्रुसेड – दोन वर्षांच्या वेढ्यानंतर एकरचा किल्ला पडला.
- १५८० – ऑस्ट्रोग बायबलचे प्रकाशन.
- १६९१ – ऑघ्रिमची लढाई – इंग्लंडच्या विल्यम दुसऱ्याने स्कॉटलंडच्या जेम्स सातव्याला हरवले.
- १८१२ – १८१२चे युद्ध – अमेरिकेने कॅनडावर आक्रमण केले.
- १८९२ – मॉँट ब्लांक पर्वतावरील सरोवर फुटले. खालील सेंट जर्व्हे गावात पूर. २०० ठार.
- १९३२ – हेडली व्हेरिटीने १० धावा देउन १० बळी घेतले व क्रिकेटमधील उच्चांक स्थापित केला.

### राष्ट्रीय

- १२९५ – संत सावता माळी यांनी समाधी घेतली.
- १९४९ – राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर घालण्यात आलेली बंदी उठविली.
- १९६१ – पानशेत धरण फुटले. त्यामुळे खडकवासला धरणास खिंडार पडल्यामुळे पुण्यात हाहाकार.
- १९८२ – शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी नाबार्डची स्थापना.
- २००६ – प्रसिद्ध संगीतकार आनंदजी भाई शहा यांना अमेरिकेतील बीएमआयच्या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### जन्म

- इ. स. पू. १०० – जगाच्या इतिहासातील श्रेष्ठ रोमन योद्धा ज्युलियस सीझर याचा जन्म.
- १३९४ – अशिकागा योशिनोरी, जपानी शोगन.
- १५९६ – मायकेल पहिला, रशियाचा झार.

### निधन

- १४४१ – अशिकागा योशिनोरी, जपानी शोगन.
- १७१२ – रिचर्ड क्रॉमवेल, ईंग्लिश राज्यकर्ता.

## : SMS :

Husband: Kal mere khawab main ek larki aye thi. Wah!
Kia Larki thee!
Wife: Akeli ayee hogi?
Husband: Tum ko kese pata?
Wife: Uska Husband mere khawab main aya tha!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.८ | २४.६ |
| अहमदनगर | ३१.९ | २३.५ |
| अकोला | ३७.८ | २६.२ |
| अमरावती | ३६.६ | २६.७ |
| बीड | ३९.६ | ३०.८ |
| भंडारा | ३९.५ | २६.९ |
| बुलढाणा | ३३.५ | २६.९ |
| चंद्रपूर | ३९.२ | ३०.६ |
| चेन्नई | ४०.६ | ३३.२ |
| नवी दिल्ली | ३९.९ | २७.१ |
| धुळे | ३७.५ | २६.६ |
| गोंदिया | ३८.८ | २६ |
| जळगाव | ३७.९ | २६.४ |
| कोल्हापूर | ३१.५ | २३.८ |
| लातूर | ३३.६ | २४.३ |
| मुंबई | ३७.१ | ३२.९ |
| नागपूर | ३९.२ | २९.६ |
| नांदेड | ३६.७ | २६.२ |
| नंदूरबार | ३४.६ | २५.९ |
| नाशिक | ३१.९ | २४.६ |
| पुणे | २९.३ | २३.१ |
| पंढरपूर | ३५.६ | २४.६ |
| सातारा | ३२.२ | २३.६ |
| सांगली | ३३ | २४.२ |
| सोलापूर | ३५.५ | २४.७ |
| वर्धा | ३८.८ | २९.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** नेहमीच्या कामाची धावपळ, दगदग यातून सुटका करून घेण्याकरिता थोडीशी विश्रांती घ्यावीशी वाटेल.

**तुळ :** ताण कमी झाल्याने तुम्ही तुमचा मोहरा स्वत:च्या विरंगुळ्याकरिता घालवण्याकडे वळवाल.

**वृषभ :** व्यापार–धंद्यातील तातडीची कामे संपल्याने हायसे वाटेल. नवीन करार, कामांसंबंधी बोलणी, चर्चा होतील. तांत्रिक अडचणी पार कराव्या लागतील.

**वृश्चिक :** व्यापार–उद्योगात आधुनिकता आणण्यासाठी चार पैसे खर्च करायची तुमची तयारी असेल. परदेश व्यवहारांना चालना मिळेल.

**मिथुन :** नोकरीमध्ये संस्थेचे हित जपा. कामाच्या ताणामुळे प्रकृतीच्या तक्रारी जाणवतील. त्यावर वेळीच औषधोपचार करा. वादविवादात भाग घेऊ नका.

**धनु :** नोकरीतील आनंद देणारे काम तुमच्यात उत्साह निर्माण करेल. घरामध्ये नवीन व्यक्तीच्या आगमनाने जीवन फुलून उठेल.

**कर्क :** विद्यार्थ्यांनी मन शांत ठेवावे. एक चांगले तर एक मनाविरुद्ध अशा घटना घडणार आहेत. पैशाची परिस्थिती सुधारत नाही असे वाटेल.

**मकर :** स्वत:च्या आवडीच्या क्षेत्रात वेगळेपण सिद्ध कराल. व्यवसाय धंद्यात महत्त्वाची संधी तुमच्यात उत्साह निर्माण करेल.


**सिंह :** ताण वाटला तरी नंतर त्यातून फायदा होईल. एखादी चांगली संधी दृष्टिक्षेपात येईल. बुद्धिमत्तेची चुणूक दाखवायची संधी तुमच्या नेहमीच्या कार्यक्षेत्रातून मिळेल.

**कुंभ :** परदेश व्यवहारातील कामे मार्गी होतील. नोकरीत कंटाळवाणे काम संपल्याने रजा किंवा तशाच प्रकारची सवलत मिळेल.

**कन्या :** परदेश व्यवहारांना चालना मिळेल. नोकरीमध्ये वरिष्ठांचा अपमान होणार नाही याची काळजी घ्या. सदस्यांच्या सुखाकरिता प्रयत्न कराल.

**मीन :** तरुणांना मित्र–मैत्रिणींच्या सहवासाचे आकर्षण वाटेल. घरातील ठरविलेल्या कार्यक्रमाने ताजेतवाने व्हाल. विद्यार्थ्यांनी स्वप्नात रंगून जाऊ नये.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १००८



### आडवे शब्द

१. शरीर
३. '– ---- --- तोचि आवडे देवाला'
१०. सद्य, चालू
११. गणपती
१३. भांडकुदळ
१४. देवीने मारलेला राक्षस
१६. वक्राकार
१८. पेरणी
२१. मतभेद
२२. पर्वा
२३. पाणी
२६. अव्यवस्थित
२८. पूर्वज
२९. बगळा
३०. पूर्ण भरतीची वेळ
३१. मजा
३२. आकांक्षा
३३. काटकी
३४. देव
३५. अल्प
३६. 'सागरा धरणी मिळते, तिथे तुझी मी वाट पाहते'
३९. पहाड
४०. गजानन
४२. वास्तव
४४. कामवाली
४६. आपला देश
४७. त्याप्रमाणे
४९. तृण
५०. वायू
५१. मंत्रांचे उद्गाते
५२. छाननी
५३. चोप
५४. अभिप्राय
५५. सध्या
५६. नवरदेव
५७. एक भारतीय तंतुवाद्य
५८. ऐकलेले
५९. खंदक
६०. थोडे
६१. सुग्रीवाचा भाऊ
६२. गाव
६४. हरवलेले
६५. डझन
६६. स्वंयपाक करण्याचे साधन
६८. संध्याकाळची वेळ
७१. लेखी ठरवलेली गोष्ट
७२. नियंत्रण
७३. मिठी
७४. अभिनेता
७५. प्रयोजन
७६. सैन्याचा प्रमुख
७८. दाणादाण, फजिती
७९. वेदांची संख्या
८०. नव्वद हिंदीत
८१. तोपर्यंत
८२. सळई
८३. --- -- तिकडे विहीर
८४. पांडवांचा सहावा भाऊ
८५. शिखर

### उभे शब्द

१. यायातीचा बायको
२. शिव, ४. अंक, संख्या
५. कमी, उणे
६. अंगरखा, ७. रियाझ
८. नाव, ९. खेद
१०. राखून ठेवलेले
१२. औषध
१५. थंडीचा ऋतू
१७. करणारा
१९. मैत्री
२०. गोंधळणे, कच खाणे
२२अ. किनारा
२४. दुधाचा घट्ट पदार्थ
२५. शिल्लक ठेव
२७. थाप
२८. नेट, तगादा
३०. लाकूडफाटा, जळण
३२. या ठिकाणी
३३. घटस्फोट
३५. कमी बोलणारा
३७. '– --- -- त्याच गावच्या बाभळी'
३८. सुकुमार
४०. अवस्था
४१. जेवणानंतरचा हलका व्यायाम
४३. रमलेला
४५. पद्धत
४८. नवऱ्याचे घर
५१. सत्य
५३. कुरघोडी
५४. उत्साहाचा अभाव
५५. खात्री
५७. टांग
५८. रेडिओवरचा नाट्यप्रयोग
६०. मळलेले
६१. मरुत
६२. नगरपालिकेतील लोकप्रतिनिधी
६३. मग्न
६५. सूक्ष्म तपशील
६६. चिवड्याची जोडीदार
६७. आलेला, प्रकटलेला
६९. निष्णात
७०. समय
७२. शपथ
७३. चहाचा पेला
७४. कंठ
७५अ. दर्दी, अभिरुचीसंपन्न
७७. श्रीफळ
७८. याच्यामागे प्रेम असल्यास हृदय विदीर्णच झाले म्हणायचे!
७९. चक्र
८०. अडचण

### जम्बो शब्दकोडे क्र. १००७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.लालूप्रसाद यादव ७.अचानक ९.कोस ११.हर १२.दरसाल १४.पलायन १५.नगर १६.कवी १७.हटवादी २०.लस २१.वर्ण २२.वात २३.सनदशीर २६.लज्जास्पद २७.दारू २९.वाया ३०.कपटी ३२.नीरस ३४.ससाणा ३६.अमर ३७.कसकस ३८.रामराम ४१.पातक ४३.रम ४४.आसन ४५.दाखला ४६.जळजळ ४७.नरम ४८.कास ५१.घेवडा ५२.वदंता ५२अ. महाराजा ५३.त्राता ५४.ओळख ५६.डक ५७.थडगे ५८.पार ६०.वेतन ६२.चरा ६४.डफली ६६.दरवळ ६८.कसा ७०.मजा ७०अ. खो ७१.वाल ७२.साखर ७३. समाचार ७४.तळवा ७६.बाळ ७८.बन ७९.क्षालन ८०.टक्का ८१.मनमुराद

उभे उत्तर : १.लालनपालन २.प्रहर ३.सार ४.यादवी ५.दर ६.वसाहत ८.कपबशी ९.कोयल १०.सनसनाटी १३.लट १६.कर्ण १८.वास १९.दीनवाणा २१.वदनी कवल घेता २२.वारू २४.दया २५.रकमपात २७.दास २८.दसरा ३१.परत ३३.रस ३५.साम दाम दंड भेद ३७.कमळ ३८.रास ३९.मनन ४०.कलाकार ४२.कस ४३.रजनीनाश ४४.आरडाओरड ४९.समता ५०.सराईत ५२.ताक ५३.लगेच ५५.खपली ५९.नवल ६१.नजरकैद ६३.रमारक्षा ६५.फराळ ६७.रवाळ ६८.कसब ६९.सामान ७४.तन ७५.वाट ७६.बाका ७७.पान

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### एस.पी. कॉलेज होर्डिंग करारप्रकरणी कारवाई; महापालिका आणि मुद्रांक विभागाची नोटीस

पुणे (दैनिक संध्या) : होर्डिंग करारातील अनियमिततेप्रकरणी नोंदणी व मुद्रांक विभागाने आणि महापालिकेने शैक्षणिक संस्था शिक्षण प्रसारक मंडळी या संस्थेला नोटीस बजावल्या आहेत. या कारवाईमुळे संबंधित प्रकरणाची प्रशासनाकडून गंभीर दखल घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. शिक्षण प्रसारक मंडळीने टिळक रोड येथील एस. पी. कॉलेज परिसरात उभारलेल्या सहा जाहिरात फलकांसाठी सिद्धिविनायक ॲडव्हर्टायझिंग कंपनीसोबत सन २०२१ मध्ये ७२ महिन्यांचा करार केला. मात्र, हा करार नोंदणीकृत करण्याऐवजी केवळ नोटराइज केल्याचा आरोप युवक काँग्रेसचे सरचिटणीस सागर धाडवे यांनी केला होता. याप्रकरणी नोंदणी व मुद्रांक विभाग, धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि पुणे महापालिकेकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयाने संबंधितांना नोटीस बजावली आहे. तसेच, नोंदणी व मुद्रांक विभागानेही शासनाची फसवणूक झाल्याबाबत खुलासा मागवत नोटीस जारी केली आहे. त्यात सात दिवसांच्या आत लेखी उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले असून, समाधानकारक उत्तर न मिळाल्यास नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

### खडकवासलाच्या काठावर बांधकामाचा धडाका; पुणेकरांच्या पाणी सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहराला पिण्याचे पाणी पुरविणाऱ्या खडकवासला धरणाच्या अत्यंत संवेदनशील परिसरात सुरू असलेल्या बांधकामामुळे खळबळ उडाली आहे. गोऱ्हे खुर्द (ता. हवेली) येथील हद्दीत धरणाच्या अगदी काठालगत सुरू असलेल्या या बांधकामामुळे जलसुरक्षा, पर्यावरण आणि लाखो नागरिकांच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित यंत्रणांच्या भूमिकेवर तीव्र संशय व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, धरणालगत निवासी प्रकल्प उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. मात्र, या कामासाठी आवश्यक असलेल्या पीएमआरडीएच्या मंजुरी, विकास परवानग्या, मंजूर नकाशे, जलसंपदा विभागाची ना-हरकत आणि इतर कायदेशीर परवानग्या प्रत्यक्षात आहेत का? हा मूलभूत प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत गोऱ्हे खुर्द ग्रामपंचायतीने संबंधितांना नोटीस बजावत सर्व कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तरीही स्थानिकांच्या आरोपानुसार, नोटीस दिल्यानंतरही बांधकाम सुरूच असल्याचे दिसत आहे. त्यामुळे प्रशासनाची कारवाई केवळ कागदोपत्री आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### पुणेकरांसाठी पाणी कपात रद्द; मात्र वारकऱ्यांना करावा लागला टंचाईचा सामना

पुणे (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसाठी शहरातील पाणी कपात रद्द करण्यात आली. पण पालखी मुक्कामी असणाऱ्या ठिकाणी नाना पेठ, भवानी पेठ, गुरूवार पेठ या भागातील जलवाहिनीत हवा अडून राहिल्याने पाणी पुरवठा विस्कळीत झाला. त्यामुळे वारकऱ्यांना पाणी टंचाईचा सामना करावा लागला. जून अखेरपर्यंत धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस पडला नाही. त्यामुळे खडकवासला धरण साखळीत अवघा तीन टीएमसी पाणी साठा शिल्लक राहिला होता. त्यामुळे पुणे महापालिकेने एक दिवसाआड पाणी कपात केली होती. पण संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी शहरात आल्यावर वारकऱ्यांचे पाण्यासाठी हाल होउ नये म्हणून १२ जुलैपर्यंत पाणी कपात रद्द करण्याची घोषणा महापौर मंजूषा नागपुरे यांनी केली होती. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या गुरूवारी पुण्यात आल्या. या पालख्या बरोबर असलेले वारकरी शुक्रवारी सकाळी वारकरी अंघोळ, कपडे धुवणे आदी कारणासाठी गेले असता त्यांना शाळा, मंगलकार्यालये, महापालिकेने तयार केलेले पानवठे येथे पाणीच नसल्याचे समोर आले. काही पुरेसा दाबाने पाणी पुरवठा झाला नाही. त्यावर पालिकेकडे तक्रार करण्यात आली. त्यावर पालिकेने टॅकरची व्यवस्था केली आहे.



# अपोलो हॉस्पिटल्सकडून वारकऱ्यांसाठी ‘वारी केअर कॅम्प’चे आयोजन

पुणे (दै. संध्या)



दरवर्षी लाखो वारकरी भगवान विठ्ठलांच्या दर्शनासाठी सुमारे ३०० किलोमीटरची पंढरपूर वारी पायी पूर्ण करतात. या पवित्र यात्रेदरम्यान वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने आणि समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपत अपोलो हॉस्पिटल्स पुणे, शंकर शेठ रोड, स्वारगेट यांच्या वतीने विशेष ‘वारी केअर कॅम्प’ आयोजित करण्यात आला. या उपक्रमाद्वारे वारकऱ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याणासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

या उपक्रमांतर्गत वारकऱ्यांना पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी रेनकोट वितरित करण्यात आले. तसेच विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात अपोलो हॉस्पिटल्सच्या अनुभवी डॉक्टरांनी आणि आरोग्यसेवा तज्ज्ञांनी वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार, आवश्यक औषधांचे वाटप तसेच वैद्यकीय सल्ला दिला.

वारीदरम्यान होणारा शारीरिक ताण लक्षात घेऊन वारकऱ्यांना आरोग्य मार्गदर्शिका देखील वितरित करण्यात आली. या पुस्तिकेमध्ये वैयक्तिक स्वच्छता, पुरेसे पाणी पिणे, संतुलित आहार तसेच प्रवासादरम्यान घ्यावयाच्या आवश्यक आरोग्यविषयक खबरदारीबाबत उपयुक्त माहिती देण्यात आली असून, वारकऱ्यांनी संपूर्ण प्रवासात स्वतःच्या आरोग्याची योग्य काळजी घ्यावी हा त्यामागील उद्देश आहे. याबाबत अपोलो हॉस्पिटल्स पुणेच्या टीमने सांगितले की, "आरोग्यसेवा ही केवळ रुग्णालयाच्या चार भिंतींपुरती मर्यादित नसते. महाराष्ट्राच्या सर्वात पवित्र आणि श्रद्धास्थानी असलेल्या वारी परंपरेत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करणे ही आमच्यासाठी सामाजिक बांधिलकी आहे. या उपक्रमाद्वारे प्रत्येक वारकरी उत्तम आरोग्य, आत्मविश्वास आणि मनःशांतीसह आपली पवित्र यात्रा पूर्ण करू शकेल, हीच आमची अपेक्षा आहे."

‘वारी केअर कॅम्प’ हा अपोलो हॉस्पिटल्स पुणेच्या समाजाभिमुख उपक्रमांचा एक महत्त्वाचा भाग असून, दर्जेदार आरोग्यसेवा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि प्रत्यक्ष वैद्यकीय सहाय्य यांच्या माध्यमातून प्रत्येक वारकऱ्याला वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा रुग्णालयाचा प्रयत्न आहे.



## वारीच्या निमित्ताने वारकऱ्यांसाठी आयोजित ‘प्रथमोपचार प्रशिक्षण’शिबिराला प्रतिसाद!

पुणे (दै. संध्या)

जीवनात कोणत्याही वेळी अपघाती प्रसंग किंवा वैद्यकीय मदतीची गरज उद्भवू शकते.अशा वेळी रुग्णालयात जाण्यापूर्वी मिळणारे प्रथमोपचार हे केवळ उपचार नसून ते जीवदान ठरू शकतात. सध्या सुरू झालेल्या आषाढी वारीसारख्या प्रवासादरम्यान किरकोळ दुखापतींपासून ते गंभीर आजारासारखी कोणतीही स्थिती निर्माण झाल्यास अशा वेळी घाबरून न जाता धैर्याने परिस्थिती हाताळण्यासाठी आणि प्रत्यक्ष डॉक्टरांकडे नेण्यापूर्वी रुग्णाची स्थिती अधिक बिघडू नये, याकरिता प्रथमोपचाराचे मूलभूत ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे, याच उद्देशाने हिंदु जनजागृती समितीच्या वतीने आषाढी वारी निमित्त 10 जुलै रोजी नाना पेठेतील श्रीराम मंदिर आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय शाळा या ठिकाणी वारकरी बंधूंसाठी मोफत प्रथमोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरातील सहभागी वारकऱ्यांना प्रामुख्याने रुग्णाची श्वास पडताळणी कशी करावी आणि मनगट तसेच गळ्याची नाडी कशी तपासावी, खांदा निखळणे, बरगड्यांना अस्थिभंग होणे, तसेच हाताला दुखापत झाल्यास त्रिकोणी पट्टीच्या साहाय्याने दंड झोळी किंवा मनगट झोळी कशी बांधावी, गंभीर रुग्णाचा प्रतिसाद तपासणे आणि हृदयक्रिया बंद पडलेल्या रुग्णाच्या छातीवर दाब देऊन त्याचे प्राण कसे वाचवावेत अशा विषयी केवळ माहिती न देता प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सौ.रेवती पेठे आणि सौ.हेमलता म्हात्रे, सौ.अर्चना पावगी यांनी दाखवली.

## इस्कॉनतर्फे १८ जुलै रोजी बानेरमध्ये भव्य जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन

पुणे (दै. संध्या)

बानेरच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच, आगामी १८ जुलै २०२६ रोजी अत्यंत भव्य आणि नयनरम्य भगवान जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, इस्कॉन बीसीईसी (ISKCON BCEC), पुणे तर्फे आयोजित हा भव्य अध्यात्मिक सोहळा पुरीच्या जगन्नाथ संस्कृतीची अनुभूती बानेरकरांना देणार आहे.

ही भव्य रथयात्रा दुपारी १:०० वाजता बानेर येथील गणराज चौक येथून सुरू होईल. भाविक आणि नागरिक एकत्र येऊन भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा देवी यांचा सुंदर सजवलेला रथ ओढतील, ही यात्रा बानेरच्या प्रमुख मार्गांवरून जात गोविंद गार्डन, सोमेश्वरवाडी येथे संपन्न होईल.

रथयात्रा गोविंद गार्डन येथे पोहोचल्यानंतर, तिथे रथाच्या सांगता सोहळ्यानिमित्त श्री जगन्नाथ कथा, भक्तीमय सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे विशेष आयोजन करण्यात आले आहे.

इस्कॉन संस्थेमध्ये रथयात्रेला एक महान जागतिक वारसा आहे. इस्कॉनचे संस्थापक-आचार्य श्रील प्रभुपाद यांनी भारताबाहेर पहिल्यांदा अमेरिकेतील लॉस एंजिल्समध्ये ऐतिहासिक रथयात्रेचे आयोजन केले होते। त्यांच्याच पाऊलावर पाऊल ठेवून आज जगभरातील सर्व इस्कॉन मंदिरांद्वारे दरवर्षी अतिशय उत्साहात रथयात्रा काढली जाते, जेणेकरून देवाला स्वतः मंदिराबाहेर आणून जनतेला आशीर्वाद देता येतील.

इस्कॉन बीसीईसी पुणे तर्फे सर्व बानेर आणि पुणेकर नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी या मंगलमय सोहळ्यात आपल्या कुटुंबासह मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभागी व्हावे व भगवान जगन्नाथांच्या चरणी लीन होऊन कृपाशीर्वाद घ्यावा.

## विजयभूमी विद्यापीठ-NTTF उपक्रमामुळे उत्पादन क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी उच्च शिक्षणाची नवी संधी

पुणे (दै. संध्या)



विजयभूमी विद्यापीठ आणि नेट्टूर टेक्निकल ट्रेनिंग फाउंडेशन (NTTF) यांच्या संयुक्त उपक्रमातून देशातील उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्रातील कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थींसाठी कौशल्य प्रशिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतचा नवा मार्ग खुला झाला आहे. टाटा मोटर्सच्या पिंपरी-चिंचवड येथील प्रकल्पात आयोजित संयुक्त पदवीदान समारंभात कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थींना मेकॅट्रॉनिक्समधील तांत्रिक डिप्लोमा प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० मध्ये व्यावसायिक कौशल्ये आणि उच्च शिक्षण यांचे एकत्रीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमातून त्या उद्दिष्टाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. या भागीदारीअंतर्गत NTTF चा मेकॅट्रॉनिक्स अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखड्याशी (NHEQF) सुसंगत विद्यापीठमान्य तांत्रिक डिप्लोमा मिळणार आहे. त्यानंतर ते नोकरी सुरू ठेवत ॲडव्हान्स्ड टेक्निकल डिप्लोमा आणि बी.टेक. (मेकॅट्रॉनिक्स) पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊ शकणार आहेत.

विजयभूमी विद्यापीठाचे अध्यक्ष संजय पडोदे यांनी सांगितले की, कार्यस्थळी मिळणारे प्रत्यक्ष ज्ञान आणि कौशल्य यांना औपचारिक उच्च शिक्षणाशी जोडणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना करिअरमध्ये खंड न पडता शैक्षणिक प्रगतीची संधी उपलब्ध होईल.

NTTF चे व्यवस्थापकीय संचालक रवी तेनेटी यांनी सांगितले की, या भागीदारीमुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात कार्यरत राहून आजीवन शिक्षण आणि उच्च शिक्षणाची संधी मिळेल.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रविकेश श्रीवास्तव यांनी हा उपक्रम उद्योग, कौशल्य विकास आणि उच्च शिक्षण यांच्या प्रभावी एकत्रीकरणाचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगितले. टाटा मोटर्सचे मुख्य मानव संसाधन अधिकारी सीताराम कांडी यांनीही या उपक्रमाचे स्वागत करत, कार्यरत कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त पदवी मिळवून देण्याचा हा प्रयत्न भविष्यातील सक्षम आणि स्पर्धात्मक उत्पादन क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे नमूद केले.

## भारतीय क्रिकेटविश्वातील दिग्गज संदीप पाटील यांची 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मध्ये खास उपस्थिती!

पुणे (दै. संध्या)

सोनी मराठी वाहिनीवरील प्रेक्षकांचा लाडका विनोदी कार्यक्रम 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' गेली अनेक वर्षे महाराष्ट्राला मनमुराद हसवत आहे. दर्जेदार विनोद, कलाकारांची अफलातून सादरीकरणे आणि प्रत्येक वयोगटातील प्रेक्षकांशी जुळलेली नाळ यामुळे हा कार्यक्रम आज घराघरातील आवडीचा ठरला आहे. याच लोकप्रियतेची प्रचिती आगामी सोमवारच्या विशेष भागात पुन्हा एकदा पाहायला मिळणार आहे.

भारतीय क्रिकेटविश्वातील दिग्गज संदीप पाटील, त्यांचे सुपुत्र आणि सुप्रसिद्ध अभिनेते चिराग पाटील, तसेच नात रियाना पाटील, अशा तीन पिढ्या एकत्र 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या मंचावर विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमातील भन्नाट स्किट्सचा मनमुराद आनंद घेत त्यांनी कलाकारांच्या सादरीकरणालाही भरभरून दाद दिली. यावेळी संदीप पाटील म्हणाले, "खूप दिवसांपासून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या सेटवर येण्याची इच्छा होती. आज ती इच्छा पूर्ण झाली, याचा खूप आनंद आहे. आम्ही घरी आवर्जून आणि नियमितपणे 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' पाहतो. कार्यक्रमातील अनेक स्किट्स मला इतकी आवडतात की ती अक्षरशः पाठ झाली आहेत. ती स्किट्स मी इतक्या वेळा पाहिली आहेत. एकीकडे जर क्रिकेटची मॅच सुरू असेल आणि दुसरीकडे 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' सुरू असेल, तर माझं संपूर्ण लक्ष 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'कडेच असतं. एवढा हा कार्यक्रम मला आवडतो. सुनील गावसकर, दिलीप वेंगसरकर आणि बलविंदर संधू यांच्यासोबतच मराठी न समजणारे आमचे अनेक मित्रही 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' आवर्जून पाहतात. हा कार्यक्रम भाषेच्या पलीकडे जाऊन प्रत्येकाला मनापासून हसवतो, हीच त्याची खरी ताकद आहे."



एका कार्यक्रमाने तीन पिढ्यांना एकत्र आणत दिलेला आनंद आणि त्याच्याशी निर्माण झालेलं भावनिक नातं या विशेष भागातून अनुभवायला मिळणार आहे. संदीप पाटील, चिराग पाटील आणि चिमुकली रियाना यांनी कलाकारांसोबत घालवलेले आनंदाचे क्षण आणि हास्याने भरलेले वातावरण या भागाला आणखी खास बनवणार आहे.

हास्याचे भन्नाट स्किट्स, तीन पिढ्यांची खास उपस्थिती आणि संदीप पाटील यांच्या मनोगताने सजलेला 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' चा हा विशेष भाग पाहायला विसरू नका.

# सोनालिकाने होशियारपूर येथील प्रकल्पातून २० लाखाव्या ट्रॅक्टरचे केले भव्य अनावरण

**केवळ उत्पादनाचा टप्पा गाठणे इतकेच नाही, तर २० लाखावा ट्रॅक्टर हे शेतकऱ्यांना 'जिंकण्याचे सामर्थ्य' देऊन त्यांना सक्षम करण्याच्या आणि ग्रामीण समुदायांमध्ये शाश्वत मूल्य निर्माण करण्याच्या सोनालिकाच्या कटिबद्धतेचे प्रतीक**

पुणे (दै. संध्या)

भारतातील ट्रॅक्टर निर्यातीतील आघाडीचा ब्रँड असलेल्या 'सोनालिका ट्रॅक्टर्स'ने नुकताच पंजाबमधील होशियारपूर येथील आपल्या 'जगातील सर्वात मोठ्या एकात्मिक ट्रॅक्टर निर्मिती प्रकल्पा'तून २० लाखाव्या ट्रॅक्टरचे भव्य अनावरण केले. हे नवीन संपादन जागतिक दर्जाच्या नाविन्यपूर्णतेच्या जोरावर शेतकऱ्यांच्या गरजांना प्राधान्य देणारी उत्पादने विकसित करण्याच्या कंपनीच्या ३० वर्षांच्या गौरवशाली वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा दर्शवते आणि जगातील प्रमुख ट्रॅक्टर उत्पादकांमध्ये कंपनीचे स्थान अधिक प्रबळ करते.

सोनालिकासाठी गुणवत्तेचे सर्वोच्च निकष राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि यासाठी कंपनी सातत्याने रोबोटिक्स व ऑटोमेशनवर आधारित प्रगत स्वयंचलित प्रक्रियांचा वापर करते. शेतकऱ्यांचा दीर्घकालीन विश्वास संपादन करण्यासाठी, कामगिरी, टिकाऊपणा आणि विश्वासार्हता यांबाबतच्या सर्वोच्च मानकांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने सोनलिकाचा प्रत्येक ट्रॅक्टर कसून चाचण्या आणि पडताळणीच्या विविध टप्प्यांतून जातो. या ब्रँडच्या प्रचंड उत्पादन क्षमतेचे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे, शक्तिशाली ट्रॅक्टरच्या निर्मितीसाठी लागणारा प्रत्येक सुटा भाग स्वतःच्या कारखान्यातच तयार करण्याची पूर्ण क्षमता या सुविधेत आहे.

इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीपक मित्तल म्हणाले, “आमच्या २० लाखाव्या ट्रॅक्टरचे अनावरण हे भारतीय अभियांत्रिकी कौशल्यावर आणि दूरदृष्टी, नावीन्य व उत्कृष्ट अंमलबजावणीच्या जोरावर विविध भौगोलिक प्रदेश आणि कृषी परिस्थितींमध्ये किती मोठी मजल मारता येते, यावर भर देते. तीन दशकांपूर्वी होशियारपूरमध्ये सुरू झालेला हा प्रवास आज १५० हून अधिक देशांतील शेतकऱ्यांना उत्साह देत आहे, ज्यामुळे सोनालिका एक जागतिक स्तरावर प्रतिष्ठित ब्रँड आणि भारतातील नं.१ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड म्हणून स्थापित झाला आहे. या यशाचा आम्हाला अभिमान वाटत असला तरी आम्ही विकासाला गती देणे, आमचा आंतरराष्ट्रीय ठसा अधिक दृढ करणे आणि नावीन्य, चपळता व उत्कृष्ट अंमलबजावणीच्या जोरावर जागतिक नेतृत्वाचा पुढील अध्याय निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत.”




होशियारपूर प्लांटमध्ये आयोजित उत्पादनाच्या एका महत्त्वपूर्ण टप्प्यानिमित्त आयोजित समारंभात बोलताना, 'इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेड'चे सह-व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "आमच्या प्लांटमध्ये कच्च्या पोलादावर प्रक्रिया करण्यापासून ते आमच्या ट्रॅक्टर्सद्वारे जगातील सर्वात कठीण भूप्रदेशांवर विजय मिळवण्यापर्यंत, आमच्या कारखान्याचा प्रत्येक क्षण एकाच भावनेने प्रेरित आहे: ती म्हणजे, आम्ही कितीही प्रगती केली तरी, जगाचे पोट भरणाऱ्या हातांची समृद्धी सुनिश्चित करणे हेच आमचे मूळ ध्येय राहील. सर्व घटकांचे १००% उत्पादन स्वतःच्याच कारखान्यात करत असल्यामुळे, आमच्या प्रत्येक ट्रॅक्टरमध्ये आमच्या अंतर्गत क्षमतांचे सामर्थ्य आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाची अचूकता एकवटलेली असते; यातूनच शेतकऱ्यांना 'जिंकण्याचे सामर्थ्य' मिळते. एका लहान शहरातील उद्योगाने काय साध्य केले जाऊ शकते, याचे सर्व संकेत आम्ही मोडीत काढले आहेत आणि जोपर्यंत प्रत्येक शेतकऱ्याच्या हाती सर्वोत्तम भारतीय अभियांत्रिकीची ताकद येत नाही, तोपर्यंत आम्ही थांबणार नाही. शेतकऱ्यांच्या प्रगतीचा पुढील अध्याय घडवण्यासाठी आम्ही अधिक दृढनिश्चयी आहोत आणि 'स्वप्नांना बळ: होशियारपूर ते जगभरात' या ध्येयासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

# ॲम्पियरआवर एनर्जीचा भारतातील स्मार्ट ऊर्जा साठवण उत्पादनात विस्तार

**पुणे (दै. संध्या) :**

बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम (BESS) क्षेत्रातील आघाडीची फुल-स्टॅक सोल्यूशन्स कंपनी ॲम्पियरआवर एनर्जीने आज पुण्यातील चाकण येथे आपल्या नव्या BESS उत्पादन व इंटिग्रेशन केंद्राचे उद्घाटन केले. या अत्याधुनिक केंद्रामध्ये 'मेक इन इंडिया' अंतर्गत तयार होणाऱ्या कॅबिनेट व कंटेनराइज्ड बॅटरी DC-AC ब्लॉक्सचे इंटिग्रेशन करून ते युटिलिटी-स्केल तसेच कमर्शियल आणि इंडस्ट्रियल (C&I) क्षेत्रांसाठी विकसित केले जाणार आहे.

हा प्लॅटफॉर्म हार्डवेअर-ॲग्नॉस्टिक आर्किटेक्चर, कंपनीची मालकीची Energy Management System (EMS), सबसिस्टम इंजिनिअरिंग आणि प्रगत सुरक्षा डिझाइन यामधील ॲम्पियरआवरच्या कौशल्याचा AH-Suite (AmpereHour Factory Suite) या डिजिटल फॅक्टरी गुणवत्ता व्यवस्थापन आणि उत्पादन चाचणी प्लॅटफॉर्मशी संगम घडवतो. त्यामुळे प्रत्येक प्रणालीची संपूर्ण ट्रेसेबिलिटी, कार्यक्षमतेची पडताळणी आणि उत्पादन केंद्रापासून प्रत्यक्ष वापरापर्यंतचा प्रवास अधिक वेगवान व विश्वासार्ह होतो. गेल्या अनेक वर्षांपासून गुंतागुंतीच्या BESS प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी करताना मिळालेल्या अनुभवाच्या आधारे ॲम्पियरआवरने उत्पादन क्षेत्रात प्रवेश केला आहे. ग्राहकांच्या गरजा तसेच प्रणालीची कार्यक्षमता, सुरक्षितता, विश्वासार्हता आणि संपूर्ण जीवनचक्र व्यवस्थापन या बाबींमधून मिळालेल्या अनुभवांवर हा निर्णय आधारित आहे.

या उद्घाटनप्रसंगी ॲम्पियरआवर एनर्जीचे सह-संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक श्री. राहुल शेळके म्हणाले, "ऊर्जा साठवण व्यवस्था भविष्यातील वीज ग्रीडचा कणा बनत आहे आणि भारताकडे केवळ मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचीच नव्हे तर तंत्रज्ञानाधारित नवकल्पनांमध्येही नेतृत्व करण्याची मोठी संधी आहे. प्रगत BESS उत्पादन क्षेत्रातील आमचा विस्तार हा सिस्टीम इंटिग्रेटर म्हणून अनेक वर्षांच्या अनुभवातून साकारला आहे. प्रत्यक्ष वापराच्या परिस्थितीत ऊर्जा साठवण प्रणाली अधिक सुरक्षित, स्मार्ट आणि विश्वासार्ह कशी बनवायची याचा आम्हाला सखोल अनुभव आहे. आमच्या 'मेक इन इंडिया' DC Block प्लॅटफॉर्म आणि AH-Suite सारख्या डिजिटल पायाभूत सुविधांच्या माध्यमातून आम्ही केवळ उत्पादने तयार करत नाही, तर देशाच्या दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेचा मजबूत पाया घालत आहोत."



हे नवीन केंद्र ॲम्पियरआवरच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, BESS तंत्रज्ञान इंटिग्रेटरपासून अत्याधुनिक उत्पादन प्लॅटफॉर्मपर्यंत कंपनीची वाटचाल दर्शवते. भारतासह जागतिक बाजारपेठेसाठी बुद्धिमान आणि डिजिटल पद्धतीने प्रमाणित ऊर्जा साठवण प्रणाली विकसित करण्यावर या केंद्राचा भर असेल. नियोजित ५ GWh उत्पादन क्षमतेसह, स्थानिक उत्पादन, अधिक सक्षम अभियांत्रिकी क्षमता आणि डिजिटल नवकल्पनांच्या माध्यमातून भारतातील ऊर्जा साठवण परिसंस्था अधिक मजबूत करण्यासाठी ही एक महत्त्वपूर्ण धोरणात्मक गुंतवणूक आहे. ॲम्पियरआवरच्या मालकीच्या ELINA Energy Management Systemच्या सहाय्याने कंपनीने नवीकरणीय ऊर्जा एकत्रीकरण, पीक लोड व्यवस्थापन, ग्रीडची लवचिकता आणि दीर्घकालीन मालमत्ता कार्यक्षमतेसंदर्भात महत्त्वपूर्ण कौशल्य विकसित केले आहे.

याबाबत ॲम्पियरआवर एनर्जीचे सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) श्री. आयुष मिश्रा म्हणाले, "BESS तंत्रज्ञान इंटिग्रेटर म्हणून आमच्या प्रवासातील पुढचे नैसर्गिक पाऊल म्हणजे उत्पादन क्षेत्रात प्रवेश करणे होय.

ऊर्जा साठवण म्हणजे केवळ बॅटऱ्यांची जोडणी नव्हे, तर संपूर्ण जीवनचक्रात सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह कार्यक्षमता देणाऱ्या बुद्धिमान प्रणालींची निर्मिती होय. AH-Suite च्या माध्यमातून आम्ही प्रत्यक्ष प्रकल्पांमधील अनुभव उत्पादन प्रक्रियेत समाविष्ट करत असून, प्रत्येक प्रणाली साइटवर पोहोचण्यापूर्वी डिजिटल पद्धतीने प्रमाणित केली जाते." ॲम्पियरआवरच्या उत्पादन प्रक्रियेचा पाया आता याच अनुभवांवर आधारित असून, अभियांत्रिकी कौशल्य, अत्याधुनिक सॉफ्टवेअर आणि डिजिटल व्हॅलिडेशन यांचे थेट BESS प्लॅटफॉर्ममध्ये एकत्रीकरण करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे तज्ञ संचालकपदी घोळवे व चव्हाण यांची निवड

भवानीनगर (दैनिक संध्या) : श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत श्री.हनुमंत नामदेव घोळवे व श्री.सत्यवान सुरेशराव चव्हाण यांची तज्ञ संचालक पदावर एकमताने निवड करण्यात आली. कारखान्याच्या संचालक मंडळाची एप्रिल २०२५ मध्ये निवडणूक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवारसाहेब यांनी कारखाना कार्यक्षेत्रातील ज्या गावांना संचालक मंडळात प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली नाही,अशा गावांना कारखान्याचे तज्ञ संचालक पदावर काम करण्याची संधी मिळेल,असे जाहीर केले होते. त्याप्रमाणे संचालक मंडळाने श्री.घोळवे व श्री.चव्हाण यांची तज्ज्ञ संचालक म्हणून नियुक्ती केली असल्याचे अध्यक्ष श्री.पृथ्वीराज जाचक व उपाध्यक्ष श्री.शिवाजी निंबाळकर यांनी सांगितले. या निवडीनंतर श्री.घोळवे व श्री. चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री मा. ना.श्रीमती सुनेत्रा (वहिनीसाहेब) पवार, कृषीमंत्री मा.ना.श्री.दत्तात्रय मामा भरणे यांचे व संचालक मंडळाचे आभार मानले. या प्रसंगी कारखान्याचे संचालक श्री.कैलास गावडे, ॲड.श्री.शरद जामदार,श्री.रामचंद्र निंबाळकर,श्री.पृथ्वीराज घोलप, श्री.गणपतराव कदम, श्री.प्रशांत दराडे,श्री.अजित नरुटे, श्री. विठ्ठलराव शिंगाडे,श्री.अनिल काटे,श्री. बाळासाहेब कोकेकर,श्री. संतोष मासाळ,श्री.निलेश टिळेकर, श्री.सतीश देवकाते,श्री.अशोक पाटील, श्री.मंथन कांबळे,डॉ.श्री. योगेश पाटील,श्री. तानाजी शिंदे,सौ. सुचित्रा सपकळ,सौ.माधुरी राजपूरे, कार्यकारी संचालक श्री.अशोक जाधव व जनरल मॅनेजर श्री. हनुमंत करपे उपस्थित होते.



### देशातील सर्वात मोठे ॲग्रिकल्चरल कन्व्हेंशन सेंटर नागपुरात; मुख्यमंत्र्यांनी केली पाहणी

नागपूर (दैनिक संध्या) : अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे देशातील सर्वात मोठे इंटरनॅशनल ॲग्रिकल्चरल कन्व्हेंशन अँड एक्झिबिशन सेंटर नागपुरातील दाभा परिसरात उभारले जात असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज या कामाची पाहणी करून कामाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. कृषी प्रदर्शनाशिवाय अन्य प्रदर्शने, परिषदा याकरिता कन्व्हेंशन व्हेन्यू म्हणून हे सेंटर जगभर ख्यात होईल आणि नागपूर शहराला एक वेगळी ओळख त्यामुळे मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. दाभा गावालगत पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या २१.७ हेक्टर जागेत राज्य सरकारतर्फे हे सेंटर उभारले जात आहे. विमानतळ, रेल्वे स्थानक यापासून अगदीच कमी अंतरावर हे सेंटर आहे. झिरो माईलपासून या सेंटरचे अंतर अवघे ७.८ कि.मी. आहे. चारही दिशांनी असलेली कनेक्टिव्हिटी हे या सेंटरचे वैशिष्ट्य आहे. सेंटरच्या बाहेरील भागात लँडस्केप, कारंजे राहतील. आतील भागात कॉन्फरन्स व सेमिनार हॉल, बोर्ड रूम, डायनिंग हॉल असेल. याशिवाय भव्य पार्किंग या ठिकाणी असणार आहे. दुचाकी, चारचाकींसह बसेससाठीही मोठी पार्किंग व्यवस्था या ठिकाणी करण्यात येत आहे. दोन हजार आसन क्षमतेचे ऑडिटोरियम हे येथील आणखी एक वैशिष्ट्य आहे. येथील सभागृह आकारमानाने देशातील सर्वात मोठे सभागृह असणार आहे.

### ओतूर पोलिसांची मद्यपी चालकांवर कारवाई

नारायणगाव (दैनिक संध्या) : ओतूर येथील परिसरात दारूच्या नशेत आणि निष्काळजीपणे वाहन चालवून निष्पाप नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या चालकांवर ओतूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. याप्रकरणी जुन्नर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दोषी आढळलेल्या तिन्ही चालकांना आर्थिक दंडाची शिक्षा सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जुलै रोजी ओतूर आणि उदापूर परिसरात ही विशेष कारवाई करण्यात आली होती. यामध्ये राजाराम दुधवडे आणि योगेश गोडे हे दोघे दारूच्या नशेत वाहन चालवताना आढळले होते. न्यायालयाने या दोघांनाही प्रत्येकी १०,००० रुपयांचा मोठा दंड ठोठावला आहे. याच कारवाई दरम्यान यश हिरे नावाचा चालक अत्यंत निष्काळजीपणे वाहन चालवत असल्याचे समोर आले होते. त्याच्या या बेजबाबदार वर्तनासाठी न्यायालयाने त्याला ५०० रुपयांचा दंड सुनावला आहे. ६ जुलै रोजी न्यायालयाने या तिन्ही प्रकरणांवर अंतिम सुनावणी घेत ही दंडात्मक शिक्षा जाहीर केली.

## ठाणे मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपा-शिवसेना महायुतीचा विजय

**ठाणे (दै. संध्या) :**

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीपाठोपाठ आता अध्यक्षपदाच्या निवडणुकीतही भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय चाणक्यनीतीचा करिष्मा दिसून आला आहे.

वास्तविक ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यकारिणीच्या निवडणुकीत सहकार पॅनल विरुद्ध परिवर्तन पॅनल अशी लढत झाली असली, तरीही बहुजन विकास आघाडीचे बँकेवर वर्षानुवर्षे असणारे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी रवींद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे यांनी भाजपा आणि शिवसेना या दोन्हीही पक्षांचे उमेदवार दोन्ही पॅनलमध्ये उभे केले होते. या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे दोन्ही पॅनलमध्ये मिळून १४ उमेदवार निवडून आल्याने अध्यक्षपदावर कोणाचा उमेदवार निवडून येतो हे पाहणे रंजक ठरले होते.





या रंजक राजकीय अंकानंतर झालेल्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीचे १४ तर बहुजन विकास आघाडीचे ७ उमेदवार यांनी मतदान केले. विशेष म्हणजे निवडणुकीतील पॅनलच्या माध्यमातून एकमेकांसमोर उभे ठाकलेले भाजपचे किसन कथोरे आणि कपिल पाटील या दोघांची अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मात्र एकजूट दिसून आली, हा रवींद्र चव्हाण यांच्या राजकीय प्रगल्भतेचा परिणाम असल्याचे सांगितले जात आहे. मात्र त्याचवेळी शिवसेनेचे एक मत फुटल्याने एकनाथ शिंदे यांना हादरा बसला आहे.

थोडक्यात, या राजकीय नाट्यानंतर आता ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपद भाजपा-शिवसेना महायुतीकडे गेले आहे.

## 'लॉक अप: सच या सज़ा' या शोमध्ये सरप्राईज गेस्ट व्हिजिट दरम्यान गौरव खन्नाने आपल्या घटस्फोटाबद्दल भाष्य केलं

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

नेटफ्लिक्सच्या जागतिक स्तरावर ट्रेंडिंग असलेल्या कैद्यांच्या रिॲलिटी शो लॉक अप: सच या सज़ा च्या गेट्सवर एक भावनिक क्षण पाहायला मिळाला, जेव्हा गौरव खन्नाने सरप्राईज व्हिजिटर म्हणून प्रवेश केला आणि सगळ्यांना थक्क केले.

त्याच्या अनपेक्षित आगमनामुळे आकांक्षा चमोला हिच्यासोबत भावनिक पुनर्मिलन झाले. गौरवला पाहताच ती अश्रूंनी भरून गेली आणि स्वतःला सावरू शकली नाही.

आकांक्षाला सांत्वन करताना गौरव खन्नाने तिला सांगितले की, वैयक्तिक संघर्ष मागे ठेव आणि खेळावर लक्ष केंद्रित कर. प्रेक्षकांना तुझे मजेशीर, मनोरंजक बाजू दिसू दे.

गौरव खन्ना म्हणाला, “मी इथे आलो कारण मी पाहिलं की तू अस्वस्थ आहेस. मी तुला सपोर्ट करायला आलो आहे. मजबूत राहा.”




त्यांच्या घटस्फोटाबद्दल सुरू असलेल्या चर्चेला संबोधित करताना त्याने पुढे सांगितले, “हे आता राष्ट्रीय बातमी बनले आहे आणि सगळीकडे याबद्दल बोललं जात आहे. आम्ही कायदेशीर मार्ग निवडायचं ठरवलं होतं, पण अजून कोणतीही कायदेशीर प्रक्रिया सुरू झालेली नाही. सध्या तुझ्या खेळावर लक्ष केंद्रित कर.”

त्या मनाला भिडणाऱ्या संवादाने पटकन एपिसोडमधील सर्वाधिक चर्चेतील क्षणांपैकी एक रूप घेतले आणि या जोडप्याच्या नातेसंबंधाच्या स्थितीबद्दल नव्या चर्चांना सुरुवात झाली. लॉक अप: सच या सज़ा नेटफ्लिक्सवर स्ट्रीमिंग होत आहे, दर शनिवार ते गुरुवार रात्री 8 वाजता नवीन एपिसोड्स पाहायला मिळतात.

## चंद्रकांत वारघडे पर्यावरण रक्षक 2026 ने सन्मानित

**उरण (दै. संध्या) :**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या निमित्ताने शनिपार मंडळ ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने वारकरी संप्रदायाचे सहर्ष स्वागत करण्यात आले. गुरुवार, दि. ०९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता वारकरी भोजन सोहळा उत्साहात पार पडला.

त्यानंतर शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता आयोजित कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते श्री. चंद्रकांत गोविंद वारघडे यांना त्यांच्या उल्लेखनीय पर्यावरणीय व सामाजिक कार्याबद्दल "पर्यावरण रक्षक पुरस्कार २०२६" प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




गेली १५ वर्षे माहिती सेवा समिती व दादा बाबाजी वारघडे प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून श्री. वारघडे यांनी वृक्षलागवड, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन व ग्रामीण विकासासाठी सातत्याने कार्य केले आहे. बकोरी, केसनंद व पिंपळे जगताप परिसरात त्यांनी दोन लाखांहून अधिक देशी प्रजातींच्या झाडांचे वृक्षारोपण केले असून एक कोटी झाडे लावण्याचे ध्येय त्यांनी निश्चित केले आहे.

जलसंधारण क्षेत्रात १०० कोटी लिटर पाणी जमिनीत मुरवण्याचे त्यांचे स्वप्न असून, त्यापैकी ५ कोटी लिटर पाणी जमिनीत जिरवण्याचे कार्य पूर्ण झाले आहे. त्यांनी 'छत्रपती जलाशय' उभारला असून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारकही उभारले आहे. दरवर्षी पालखी सोहळ्यात वारकऱ्यांसाठी चहा-नाश्ता तसेच देशी बियाण्यांचे मोफत वाटप केले जाते.

सन २०१४-१५ च्या दुष्काळात बारामती, इंदापूर व दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांना जनावरांसाठी १,००० टन ओल्या ऊसाच्या चाऱ्याचे मोफत वाटप करून त्यांनी मोठे सामाजिक योगदान दिले.

बकोरी येथील देवराई वनराई प्रकल्पात पक्ष्यांसाठी दररोज सुमारे ५० किलो बाजरी टाकली जाते. तसेच वड, पिंपळ, कडुनिंब, हिरडा, बेहडा, आवळा, अर्जुन, करंज, उंबर, मोह, कंचन, आपटा, गुळवेल, आंबा, चिंच, सीताफळ, रामफळ यांसह अनेक देशी व औषधी वनस्पतींचे संवर्धन करण्यात आले आहे.

वृक्षसंवर्धन, वृक्षतोडी विरोधातील भूमिका आणि विविध भ्रष्टाचार प्रकरणे उघडकीस आणण्याच्या कार्यामुळे त्यांना मागील पाच वर्षे महाराष्ट्र शासनामार्फत निःशुल्क पोलिस संरक्षण देखील देण्यात आले होते.

## आरोपी निदा खानला जामीन देताना नाशिक पोलिसांची तुलना ‘कंसा’शी करू नका!

**नाशिक (दै. संध्या) :**

आमचा न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे; मात्र, कॉर्पोरेट जिहाद प्रकरणातील आरोपी निदा खानच्या गर्भधारणेची तुलना भगवान श्रीकृष्णांच्या जन्माशी करण्यात आल्याचे अत्यंत वेदनादायी असून, त्यामुळे कोट्यवधी हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत.

सदर आरोपी न्यायव्यवस्थेचा अपमान करत सुमारे ४० दिवस फरार होती आणि तपासात सहकार्य करत नव्हती, असा आरोप आहे. नाशिक येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांवर लैंगिक छळ, मानसिक छळ आणि सक्तीने धर्मांतर घडवून आणल्याचे गंभीर आरोप तिच्यावर आहेत. तसेच निष्पाप हिंदू महिला कर्मचाऱ्यांवर धर्मांतरासाठी दबाव टाकणे आणि पीडित महिलांचा आवाज दडपण्याचेही आरोप या प्रकरणात आहेत. या सर्व गंभीर आरोपांवर न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे.

हिंदू धर्मग्रंथांनुसार, देवकीच्या आठव्या पुत्रामुळे आपला वध होईल, या भविष्यवाणीमुळे कंसाने निष्पाप देवकी आणि वसुदेव यांना कारागृहात डांबले होते. त्यामुळे या प्रकरणाची तुलना भगवान श्रीकृष्णांच्या जन्माशी केल्याने नाशिक पोलिसांची अप्रत्यक्षपणे ‘कंसा’शी तुलना केली जात असल्याचा आभास निर्माण होतो. अशा प्रकारच्या धार्मिक उपमा टाळल्या पाहिजेत. त्यामुळे तपास यंत्रणेचे मनोबल खच्ची होऊ शकते आणि हिंदूंच्या श्रद्धाही दुखावल्या जाऊ शकतात. याशिवाय, आरोपीला विशेष सवलत दिली जात असल्याचेही दिसून येते.

## प्रभावी वजन व्यवस्थापनासाठी सोहा अली खान यांच्या स्मार्ट खाद्य निवडी

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

डाएट कल्चर आणि आरोग्यविषयक परस्परविरोधी सल्ल्यांच्या लाटेमध्ये, वजन व्यवस्थापन हे पुन्हा पुन्हा नव्याने सुरुवात करण्याच्या अंतहीन चक्रासारखे वाटू शकते. जरी मर्यादित आहार पद्धती आणि तीव्र व्यायामामुळे जलद परिणाम मिळू शकतात, तरी दीर्घकाळ त्यामध्ये सातत्य राखणे कठीण होऊ शकते. वास्तविक, प्रभावी वजन व्यवस्थापन हे क्वचितच वंचित राहण्याबद्दल असते. त्याऐवजी, आजच्या व्यस्त आणि मागणीपूर्ण जीवनशैलीमध्ये सहजपणे समाविष्ट करता येतील अशा शाश्वत सवयी निर्माण करणे आणि स्मार्ट निवडी करणे याबद्दल ते आहे.

कॅलिफोर्निया बदाम ही अशीच एक निवड आहे. नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध असलेले हे बदाम 24 पोषक घटक प्रदान करतात आणि यामध्ये तृप्ती देणारे गुणधर्म असतात, जे तुम्हाला अधिक वेळ पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करू शकतात आणि तुमच्या वजन व्यवस्थापनाच्या प्रवासाला आधार देऊ शकतात.

ही प्रक्रिया कमी गुंतागुंतीची आणि अधिक सोपी करण्यासाठी, बॉलिवूड अभिनेत्री सोहा अली खान वजनाच्या उद्दिष्टांना समर्थन देण्यासाठी ज्या काही सोप्या पण स्मार्ट खाद्य निवडींवर विश्वास ठेवतात, त्या शेअर करत आहेत:

आरोग्यदायी खाण्याची सुरुवात करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आपल्या आहारात पोषक घटकांनी समृद्ध पदार्थांचा समावेश करणे. आपल्या आवडीचे पदार्थ पूर्णपणे वगळण्याऐवजी, आपल्या आहारातील पोषणाची कमतरता भरून काढणारे पदार्थ निवडा.

कॅलिफोर्निया बदाम हे मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्सने समृद्ध आहेत, ज्यामुळे ते आपल्या आहारात समाविष्ट करण्यासाठी एक उत्तम आरोग्यदायी चरबीचा स्रोत ठरतात. त्यांचे सेवन जेवणानंतर रक्तातील साखरेची पातळी वाढण्यास देखील मदत करू शकते. आपल्या आवडत्या पदार्थांचा अधूनमधून आनंद घेणे महत्त्वाचे असले, तरी त्यांच्यावर खूप जास्त अवलंबून राहिल्यास आपल्या आरोग्याच्या उद्दिष्टांशी सुसंगत राहणे कठीण होऊ शकते. त्याच वेळी, या पदार्थांपासून स्वतःला दूर ठेवल्याने त्यांची इच्छा आणखी वाढू शकते.




त्यामुळे, आपण वारंवार निवडत असलेल्या आवडीच्या पदार्थांसाठी अधिक आरोग्यदायी पर्याय शोधणे हा अधिक व्यावहारिक दृष्टिकोन ठरू शकतो. साखरयुक्त पेयांऐवजी फ्लेवर्ड पाणी निवडणे, आपल्या आवडत्या फास्ट फूडचे घरगुती पर्याय तयार करणे आणि डेझर्टसाठी फळांची निवड करणे यांसारखे छोटे बदल आपल्या आहाराची पौष्टिक गुणवत्ता सुधारण्यास मदत करू शकतात. जेवणाच्या मधल्या वेळेत भूक लागणे ही आपल्या सर्वांचीच सामान्य गोष्ट आहे आणि त्या वेळी आपण आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी स्नॅक्सकडे वळतो. हे छोटे स्नॅक्स आपली ऊर्जा पातळी टिकवून ठेवण्यास मदत करतात, परंतु भूक नियंत्रित ठेवताना एकाग्रतेला प्रोत्साहन देणारे पर्याय निवडणे महत्त्वाचे आहे. फळे आणि कॅलिफोर्निया बदाम यांसारख्या जागरूक निवडी उत्तम पर्याय आहेत, जे चव, पोषण आणि दीर्घकाळ टिकणारी ऊर्जा प्रदान करतात.

वजन व्यवस्थापनाचा विचार करता, प्रत्येक जेवणात प्रथिनांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे, कारण ते हाडांची घनता आणि स्नायूंचे प्रमाण टिकवून ठेवण्यास, चयापचय वाढविण्यास आणि खाण्याची इच्छा नियंत्रित ठेवण्यास मदत करू शकते.

अंडी, पनीर, काबुली चणे, टोफू आणि कमी चरबीयुक्त मांस हे प्रथिनेयुक्त साधे पदार्थ आहेत, ज्यांचा रोजच्या जेवणात सहज समावेश करता येतो. योग्य खाद्य निवडी करणे हा वजन व्यवस्थापनाचा एक महत्त्वाचा भाग असला तरी, आपल्या शरीराची नियमित हालचाल करणे देखील तितकेच आवश्यक आहे. व्यायामाची दिनचर्या पाळणे असो किंवा आपल्या दैनंदिन जीवनात अधिक हालचालींचा समावेश करणे असो, सक्रिय राहणे आपल्या एकूण आरोग्याच्या उद्दिष्टांना मदत करू शकते. ही सातत्यपूर्णता टिकवून ठेवण्यासाठी, ऊर्जा पातळी आणि पुनर्प्राप्तीला आधार देण्यासाठी आवश्यक असलेल्या पोषक घटकांनी आपल्या शरीराचे पोषण करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

कॅलिफोर्निया बदाम हे सक्रिय जीवनशैलीसाठी एक उत्कृष्ट समावेश आहेत. त्यामध्ये आर्जिनिन, जीवनसत्त्व ई आणि आरोग्यदायी चरबी असतात, ज्यांचा संबंध व्यायामातील कामगिरी आणि पुनर्प्राप्तीशी आहे.

# घरकुलमधील रहिवासी पाण्यासाठी रस्त्यावर

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिखली येथील घरकुल परिसरात गेल्या तीन दिवसांपासून पिण्याच्या पाण्यासाठी हाहाकार उडाला आहे. परिसरात साचलेल्या पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने आणि पिण्याच्या पाण्याच्या मुख्य टाक्यांमध्ये ड्रेनेजचे दूषित पाणी मिसळल्याने बुधवारी (दि.८) सकाळी येथील नागरिकांच्या संयमाचा बांध फुटला. संतापलेल्या शेकडो महिलांनी रिकामे हंडे आणि घागरी घेऊन थेट घरकुल चौकातील मुख्य स्पाईन रोडवर रस्ता रोको करत ठिय्या आंदोलन केले. तब्बल एक तास चाललेल्या या आंदोलनामुळे स्पाईन रोडवर तीन ते चार किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या आणि वाहतूक पूर्णपणे कोलमडली होती.

चिखली घरकुल परिसरात महापालिकेच्या ४० हून अधिक सोसायटी बिल्डिंग असून येथे हजारो नागरिक वास्तव्यास आहेत. गेल्या काही दिवसांपासून शहरात संततधार पाऊस सुरू आहे. मात्र, महापालिकेच्या ढिसाळ नियोजनामुळे या पाण्याचा परिसरातून योग्य निचरा झालेला नाही. अत्यंत गंभीर बाब म्हणजे, ड्रेनेज, मैलामिश्रित आणि सांडपाणी थेट नागरिकांच्या पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याच्या मुख्य भूमिगत टाक्यांमध्ये घुसले आहे. या भीषण समस्येबाबत स्थानिक रहिवाशांनी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. मात्र, प्रशासनाकडून घरकुलमधील रहिवाशांना कोणतीही मदत मिळाली नाही, तसेच टँकरद्वारे पर्यायी पाणीपुरवठाही करण्यात आला नाही. प्रशासनाच्या या उदासीन भूमिकेमुळे महिलांचा संताप अनावर झाला. बुधवारी सकाळी शेकडो महिलांनी रस्त्याच्या मधोमध बसून "पाणी आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे", "महापालिका प्रशासनाचा निषेध असो" अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. स्वच्छ पाणी मिळेपर्यंत मागे हटणार नाही, असा पवित्रा महिलांनी घेतला होता.

**२४ तासांचा अल्टिमेटम; मोर्चा काढण्याचा इशारा**

भरवर्दळीच्या स्पाईन रोडवर अचानक झालेल्या या आंदोलनामुळे शाळा-कॉलेजचे विद्यार्थी आणि नोकरदारांचे अतोनात हाल झाले. आंदोलनाची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अधिकाऱ्यांनी रहिवाशांची समजूत काढत ड्रेनेजचे पाणी उपसण्याचे आणि शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर महिलांनी आंदोलन मागे घेतले. "जर पुढील २४ तासांत स्वच्छ पाणी मिळाले नाही, तर महापालिका मुख्यालयावर तीव्र मोर्चा काढू," असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# मोशी दुर्घटनेचा शहरावर परिणाम; कचरा संकलन विस्कळीत, घराघरांत कचऱ्याचे डबे तुडुंब..!

## पर्यायी डम्पिंग व्यवस्था नसल्याने महापालिकेसमोर मोठे आव्हान; नागरिकांच्या तक्रारींमध्ये वाढ

**पिंपरी (दै. संध्या)**

मोशी कचरा डेपो येथे झालेल्या भीषण दुर्घटनेचा फटका आता संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराला बसू लागला आहे. दुर्घटनेनंतर डेपोवरील कामकाज मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाल्याने शहरातील घनकचरा संकलन आणि विल्हेवाट व्यवस्थेवर गंभीर परिणाम झाला आहे. कचरा टाकण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने अनेक भागांमध्ये कचरा संकलन रखडले असून नागरिकांच्या घरातील कचऱ्याचे डबे तुडुंब भरले आहेत. परिणामी, महापालिकेकडे तक्रारींचा ओघ वाढत आहे.

महापालिकेच्या दैनंदिन कचरा व्यवस्थापनाचा मोठा भार मोशी कचरा डेपोवर अवलंबून आहे.



मात्र दुर्घटनेनंतर डेपो परिसरात बचावकार्य, यंत्रसामग्रीची हालचाल आणि सुरक्षेच्या कारणास्तव नियमित कचरा विल्हेवाट प्रक्रियेवर परिणाम झाला आहे. त्यामुळे शहरातील विविध भागांतून संकलित होणारा कचरा वेळेत डेपोपर्यंत पोहोचत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

शहरातील अनेक सोसायट्या, गृहनिर्माण संस्था आणि दाट लोकवस्तीच्या भागांत दोन ते तीन दिवसांपासून कचरा उचलला गेला नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. घरातील ओला कचरा साचल्याने दुर्गंधी पसरू लागली असून डास, माशा आणि अस्वच्छतेची समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते, अशी नागरिकांची चिंता आहे.

नागरिकांकडून महापालिकेच्या हेल्पलाइन, प्रभाग कार्यालये तसेच सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात तक्रारी नोंदवल्या जात आहेत. नियमितपणे कचरा उचलला जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, तातडीने पर्यायी व्यवस्था करून कचरा संकलन पूर्ववत करण्याची मागणी जोर धरत आहे.

मोशी दुर्घटनेने शहराच्या घनकचरा व्यवस्थापनातील एक मोठी उणीवही अधोरेखित केली आहे. तब्बल लाखो लोकसंख्या असलेल्या शहरासाठी एकाच डेपोवर अवलंबून राहणे किती धोकादायक ठरू शकते, हे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. आपत्कालीन परिस्थितीत कचरा विल्हेवाटीसाठी पर्यायी जागा, अतिरिक्त प्रक्रिया केंद्रे आणि संकट व्यवस्थापनाची ठोस यंत्रणा उभारण्याची गरज आता प्रकर्षाने पुढे आली आहे.

दरम्यान, कचरा संकलन आणि विल्हेवाट व्यवस्था सुरळीत करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध पर्यायांची चाचपणी सुरू असल्याची माहिती मिळत असली, तरी प्रत्यक्षात नागरिकांना दिलासा मिळण्यासाठी ही व्यवस्था किती लवकर कार्यान्वित होते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वायसीएम रुग्णालयाची संरक्षक भिंत धोकादायक; अपघाताची टांगती तलवार

पिंपरी (दैनिक संध्या) : शनी मंदिर ते फुलेनगर या अत्यंत वर्दळीच्या मार्गालगत असलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या (वायसीएम) संरक्षक दगडी भिंतीचा मोठा भाग खचल्याने गंभीर अपघाताची भीती निर्माण झाली आहे. भिंतीवर बसविण्यात आलेले लोखंडी ग्रीलही सध्या धोकादायक अवस्थेत असून, ते कोणत्याही क्षणी रस्त्यावर कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या हजारो नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घटनेनंतर संबंधित विभागाने खबरदारीचा उपाय म्हणून धोकादायक भागाभोवती सुरक्षा फीत लावून परिसर बंदिस्त केला आहे. मात्र, केवळ फीत लावून प्रशासनाने जबाबदारी झटकली असून, कायमस्वरूपी उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे. पावसाळ्यात भिंत आणखी खचण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शनी मंदिर ते फुलेनगर हा रस्ता परिसरातील महत्त्वाचा दुवा मानला जातो. फुलेनगरमधील शाळांमध्ये जाणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना दररोज याच मार्गाचा वापर करावा लागतो. पुढे असलेल्या डी. वाय. पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचीही या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. याशिवाय महिला, ज्येष्ठ नागरिक, दुचाकीस्वार तसेच पादचारी यांची दिवसभर वर्दळ असते. रस्त्याच्या समोर पोळी-भाजी केंद्रांची दुकाने, इतर व्यावसायिक आणि रहिवासी घरे असल्याने या परिसरात नेहमीच गर्दी असते.




### पिंपरी चिंचवड काँग्रेसकडून वारकऱ्यांना रेनकोट वाटप; हिंदू-मुस्लिम एकोप्याचे दर्शन

पिंपरी (दैनिक संध्या) : जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील दापोडी यांत्रिकी भवन या ठिकाणी हिंदू मुस्लिम एकोप्याचे दर्शन घडवणारी दिंडी वारकरी सेवा करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू केलेल्या वारीसेवेला सालाबाद प्रमाणे दापोडी यांत्रिकी भवन कर्मचाऱ्यांच्या वतीने बबलू शेख मित्रपरिवार च्या वतीने दिंडीला अन्नसेवा उपक्रम राबविण्यात येतो. हा एक आगळावेगळा हिंदू-मुस्लिम धर्मीय ऐक्याचा सोहळा या ठिकाणी मोठ्या आनंदात साजरा केला जातो. पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटी कडून या आगळ्यावेगळ्या असणाऱ्या धार्मिक एकोपा जपणाऱ्या दिंडी सेवा सोहळ्यामध्ये वारकऱ्यांसाठी सेवा स्वरूपात 250 रेनकोटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी दिंडी सेवा आयोजक हमीद उर्फ बबलू शेख यांच्या कन्या साहिबा शेख आणि तल्विन शेख यांच्या मोईनुद्दीन फिजिओथेरपी सेंटरच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यात आली या मध्ये आरोग्य तपासणी, फूट मसाज सेवा, आरोग्यवर्धक औषधे वाटप, प्रथमोपचार पेट्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, दापोडी यांत्रिकी भवन विभागाचे अधिकारी, दिंडी सेवा आयोजक हमीद उर्फ बबलू शेख, अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष शहाबुद्दीन शेख, छावा मराठा युवा महासंघाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष धनाजी येळकर पाटील, प्रदेश काँग्रेस नेते केदार पाटील, काँग्रेसचे माजी सरचिटणीस कबीर मोहम्मद, विल्यम साळवी, हिराचंद जाधव, हरीश डोळस, रवी कांबळे, सार्थक बाराथे, नितीन कांबळे, अनुप अडागळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोला पुन्हा विलंब; १५ जुलैचा मुहूर्त हुकण्याची शक्यता

**पिंपरी (दै. संध्या)**

हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनासाठी पुन्हा प्रतीक्षा करावी लागणार आहे. माण ते बालेवाडी या पहिल्या टप्प्यावर १५ जुलैपासून मेट्रोसेवा सुरू करण्याचे नियोजन 'पीएमआरडीए'कडून करण्यात आले होते. मात्र, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून (सीएमआरएस) अंतिम सुरक्षा प्रमाणपत्र अद्याप प्राप्त झाले नसल्याने हा मुहूर्तही हुकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीने हैराण झालेल्या हिंजवडी परिसरातील सुमारे १० लाख आयटी कर्मचारी आणि नागरिकांच्या तोंडाला पाने पुसली आहेत.

माण ते बालेवाडीदरम्यानच्या १२ स्थानकांची सुरक्षा तपासणी नुकतीच सीएमआरएसकडून पूर्ण करण्यात आली आहे. मात्र, तपासणीनंतरचा अंतिम अहवाल आणि व्यावसायिक प्रवासी वाहतुकीसाठी आवश्यक असलेले सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय मेट्रोसेवा सुरू करता येणार नाही. त्यामुळे सर्व तांत्रिक कामे पूर्ण झाली असली, तरी प्रवाशांसाठी मेट्रो सुरू करण्यास अद्याप हिरवा कंदील मिळालेला नाही.

पीएमआरडीएच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीएमआरएसचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतरही विविध तांत्रिक, प्रशासकीय आणि कार्यान्वयनाशी संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान दोन आठवड्यांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे जुलैमध्ये मेट्रो सुरू होण्याची शक्यता कमी असून, ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात सेवा सुरू होणार आहे.

पीएमआरडीएचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी विकसक कंपनी 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड'ला वारंवार वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तरीही सेवा सुरू होण्यात सातत्याने होणारा विलंब हा प्रकल्पातील समन्वयाच्या अभावावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. प्रशासनाच्या स्पष्ट निर्देशांनंतरही आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.



२३ किलोमीटर लांबीच्या या महत्त्वाकांक्षी मेट्रो मार्गासाठी आतापर्यंत तब्बल पाच वेळा अंतिम मुदत बदलण्यात आली आहे. सुरुवातीला संपूर्ण मार्ग एकाच टप्प्यात सुरू करण्याचा मानस होता. मात्र, कामाचा वेग अपेक्षेपेक्षा मंद असल्याने राज्य सरकारने मार्चमध्ये धोरणात बदल करून टप्प्याटप्प्याने सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, माण ते बालेवाडी हा पहिला टप्पा सुरू करण्यावर भर देण्यात आला; मात्र त्यालाही आता विलंब होत आहे.

माण ते बालेवाडी टप्पा १५ जुलैपर्यंत सुरू करण्याचे निर्देश स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यापूर्वी मे आणि जून या मुदतही निश्चित करण्यात आल्या होत्या. मात्र, तांत्रिक मंजुरी आणि सुरक्षा प्रमाणपत्राच्या प्रक्रियेमुळे प्रत्येक वेळी उद्घाटन पुढे ढकलावे लागले. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात विकसक कंपनी अपयशी ठरल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात सुरू आहे.

# मोशी दुर्घटनेतील जखमींची महापौर लांडगेंनी रुग्णालयात जाऊन घेतली भेट; महापालिका सर्वतोपरी मदतीसाठी कटिबद्ध

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्प परिसरात घडलेल्या अत्यंत दुर्दैवी दुर्घटनेत जखमी झालेल्या नागरिकांची पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज मेडिकव्हर हॉस्पिटल तसेच साईनाथ हॉस्पिटल येथे प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

यावेळी महापौरांनी जखमी नागरिकांशी तसेच त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधत त्यांना मानसिक धीर दिला. या कठीण प्रसंगी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून, आवश्यक ती सर्व मदत प्रशासनामार्फत उपलब्ध करून दिली जाईल,



अशी ग्वाही त्यांनी दिली.

भेटीदरम्यान साईनाथ हॉस्पिटलचे प्रमुख आणि नगरसदस्य डॉ. सुहास कांबळे, महापालिकेतील संबंधित अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्रत्येक जखमीच्या प्रकृतीची सविस्तर माहिती घेण्यात आली. जखमींना सर्वोत्तम दर्जाचे व तातडीचे वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये, उपचारासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व शासकीय समन्वयाची तातडीने पूर्तता करावी तसेच प्रत्येक बाधित कुटुंबाला आवश्यक ती मदत उपलब्ध करून द्यावी, अशा स्पष्ट सूचना महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

महापौर रवि लांडगे म्हणाले, "ही दुर्घटना अत्यंत वेदनादायी असून प्रत्येक बाधित कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. नागरिकांचे प्राण आणि सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च जबाबदारी आहे. जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत, त्यांच्या कुटुंबियांना कोणतीही अडचण येऊ नये आणि आवश्यक त्या प्रत्येक स्तरावर महापालिका त्यांच्या सोबत राहील. या संकटाच्या काळात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची संपूर्ण यंत्रणा प्रत्येक बाधित कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे."

या दुर्घटनेतील जखमी नागरिकांनी लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावे तसेच त्यांच्या कुटुंबियांना या कठीण प्रसंगाला सामोरे जाण्याचे बळ लाभावे, अशी प्रार्थना महापौरांनी व्यक्त केली.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडून बचावकार्य, वैद्यकीय उपचार, समन्वय व आवश्यक सर्व प्रशासकीय मदत प्राधान्याने सुरू असून, बाधित नागरिकांना सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा सतत कार्यरत आहे.

# ८० उड्डाणपूल-भुयारी मार्गांवरील जाहिरात हक्कातून मिळणार दीर्घकालीन महसूल

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील 80 उड्डाणपूल व भुयारी मार्गांवरील जाहिरात हक्क 10 वर्षांच्या कालावधीसाठी अधिक दर देणाऱ्या निविदाधारकांना देण्यास मान्यता देण्यात आली. पुणे-मुंबई जुना महामार्ग, औंध-रावेत बीआरटीएस मार्ग तसेच, मुंबई-बंगळुरू महामार्गावरील जाहिरात हक्क निश्चित करण्यात आले आहे. त्याद्वारे महापालिकेला दीर्घकालीन महसूल प्राप्त होणार आहे. या निविदेस तब्बल दोन महिन्यांनंतर हिरवा कंदील देण्यात आला आहे. त्यासह विविध विकासकामांच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे होते. सभेला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, नगर सचिव मुकेश कोळप, समिती सदस्य व विभागप्रमुख उपस्थित होते. महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वरील निविदेसह शहरातील 15 हजारांहून अधिक विद्युत दिव्यांच्या खाबांवर किऑस्क जाहिराती उभारण्यासाठी सहा क्षेत्रीय कार्यालयांतील निविदांना मंजुरी देण्यात आली. तसेच 18 मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवरील दिशादर्शक फलकांवर जाहिरात हक्क देण्यासही मान्यता देण्यात आली. या सर्व जाहिरात माध्यमांमधून महापालिकेच्या कायमस्वरूपी उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे.

महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी 30 एमबीपीएस इंटरनेट लीज्ड लाईन तसेच, मंत्रालयाशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क राखण्यासाठी 4 एमबीपीएस पॉइंट-टू-पॉइंट लाईन बीएसएनएलमार्फत उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली.

# लोणावळा पूरप्रश्नी आमदार सुनील शेळके यांचे विशेष आढावा बैठकीत प्रशासनाला कडक निर्देश; पूरग्रस्तांना मदतीची ग्वाही, अतिक्रमणे हटविणार

**लोणावळा (दै. संध्या)**

लोणावळा शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीचा तातडीने निपटारा करण्यासाठी आमदार सुनील शेळके यांनी शुक्रवारी नगरपरिषद सभागृहात प्रशासनाची विशेष आढावा बैठक घेतली. या बैठकीत पूरबाधित नागरिकांना तातडीची मदत, नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे, नाल्यांवरील अतिक्रमणे हटविणे तसेच भविष्यात पूरस्थिती टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीला महसूल, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभागासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी, टाटा प्रकल्पाचे अधिकारी, नगरसेवक आणि



नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पूरबाधित कुटुंबांना टाटा कंपनीच्या माध्यमातून मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पाठपुरावा करावा, अशा सूचना आमदार शेळके यांनी दिल्या. तसेच टाटा धरणातील गाळ काढून खोलीकरण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

पूरामुळे नुकसान झालेल्या घरांचे वस्तुनिष्ठ पंचनामे उद्यापासून महसूल व नगरपरिषद प्रशासनामार्फत तातडीने सुरू करण्याचे आदेशही त्यांनी दिले. पात्र नागरिकांना शासनाची मदत वेळेत मिळावी, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

शहरातील अनेक नाल्यांवर झालेली अतिक्रमणे आणि नाले अरुंद केल्यामुळे पाण्याचा निचरा होत नसल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. त्यामुळे सर्व अतिक्रमणे तात्काळ हटवून नाले मोकळे करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले.

बैठकीनंतर आमदार सुनील शेळके यांनी पूरग्रस्त भागाचा प्रत्यक्ष दौरा करून परिस्थितीची पाहणी केली. बाधित कुटुंबांची भेट घेत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांना आवश्यकतेनुसार अन्नधान्य किट, जीवनावश्यक वस्तू आणि इतर सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

नगरपरिषदेत आपल्या समस्या मांडण्यासाठी आलेल्या अनेक नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांचे समाधान करण्याचाही प्रयत्न आमदार शेळके यांनी केला. "लोणावळ्यातील एकाही पूरग्रस्त नागरिकाला वाऱ्यावर सोडले जाणार नाही. या संकटाच्या काळात मी आणि संपूर्ण प्रशासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत," असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पूरस्थितीवर तातडीने नियंत्रण मिळविणे, नुकसानग्रस्तांना दिलासा देणे आणि भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी करण्यात आलेल्या निर्णयांमुळे ही बैठक लोणावळा शहरासाठी अत्यंत महत्त्वाची ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अतिवृष्टीमुळे बाधित नुकसानग्रस्तांना मदतीसाठी मागणी

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : खेड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेती, घरे, सार्वजनिक मालमत्ता व मूलभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. श्रीमती सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या निवेदनामध्ये खेड तालुक्यातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या सर्व गावांमध्ये महसूल, कृषी, सार्वजनिक बांधकाम, महावितरण व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त पाहणी करून नुकसानग्रस्तांचे पंचनामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. तसेच शेतकरी व नागरिकांना शासनाकडून आर्थिक मदत व नुकसानभरपाई तातडीने मंजूर करून वितरित करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. याशिवाय अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले रस्ते, पूल, संरक्षक भिंती, बंधारे, वीजपुरवठा यंत्रणा, पिण्याच्या पाण्याच्या योजना तसेच इतर सार्वजनिक सुविधांची तातडीने दुरुस्ती करून जनजीवन पूर्ववत करण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्याची विनंतीही निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी खेड तालुक्यातील नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागांकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती आमदार बाबाजी काळे यांनी दिली.




### खालुंब्रे ग्रामपंचायतीला वृक्षारोपणासाठी रोपांचे वाटप

चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील खालुंब्रे येथील ग्रामपंचायतीला वृक्षारोपणासाठी रोपांचे वाटप करण्यात आले. पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत बेलराईज इंडस्ट्रीजने खालुंब्रे येथील ग्रामपंचायतीला रोपे सुपूर्द केली. अतिवृष्टीमुळे विस्कळीत झालेल्या सुविधा पूर्ववत करण्यासाठी खालुंब्रे येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत विशेष स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी खालुंब्रे ग्रामपंचायतीचे प्रशासक एस. एस. साळुंखे व आदर्श ग्रामपंचायत अधिकारी श्रीधर नाईकडे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे यांच्या हस्ते व्यापक स्वच्छता आणि श्रमदानाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी पंडित पवार, सुदाम पवार, गणेश पवार, राजाराम खराबी, लक्ष्मण गुंड, नंदा तुळवे, शर्मिला बोत्रे, राजू बोत्रे, धनश्री पवार आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायतीचे वरिष्ठ कर्मचारी शिवाजी बोत्रे व ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन केले होते. गावातील पर्यावरण रक्षणासाठी बेलराईज इंडस्ट्रीज कंपनीच्या वतीने ग्रामपंचायतीला वृक्षारोपणासाठी विविध प्रकारची दर्जेदार रोपे सुपूर्द करण्यात आली. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या वतीने कंपनी अधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. या मोहिमेत सर्व कर्मचारी बांधव, ग्रामस्थ व तरुण आणि महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. श्रीधर नाईकडे यांनी सांगितले की," प्रदूषण टाळण्यासाठी वृक्षारोपणाची गरज आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त वृक्षारोपण करून समाजात आदर्श निर्माण केला पाहिजे. झाडे लावल्यानंतर त्यांची निगा राखणेही तितकेच आवश्यक आहे." ग्रामपंचायतीचे प्रशासक एस. एस. साळुंखे यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले.

### तरुणाने दुचाकीवरून फूस लावून पळवून नेले; 2 अल्पवयीन मुली बेपत्ता

भिगवण (दैनिक संध्या) : शेटफळगढे (ता. इंदापूर) गावातून आठवड्यात दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या आहेत. यामुळे पालक वर्गामध्ये कमालीची चिंता पसरली आहे. गावात उलट-सुलट चर्चांना वेग आला आहे. या दोन्ही बेपत्ता प्रकरणांची तक्रार भिगवण पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. पहिल्या प्रकरणात, एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी ३० तारखेला आपल्या बहिणीसोबत दुकानात बडीशेप आणण्यासाठी गेली होती. एक अल्पवयीन तरुण दुचाकीवर येऊन तिला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार मुलीच्या आईकडून देण्यात आली आहे. गेल्या आठ दिवसांपासून मुलगी बेपत्ता आहे. दुसऱ्या प्रकरणात, ७ तारखेला गावातील दुसरी एक अल्पवयीन मुलगी तिच्या आईसोबत पोर्चमध्ये झोपली असता, मध्यरात्री १२ वाजता आईला जाग येताच तिची मुलगी बाजूला दिसली नाही. घराच्या आसपास व मित्र-मैत्रिणींकडे शोध घेऊनही ती मिळाली नाही, अशी तक्रार मुलीच्या वडिलांनी भिगवण पोलिस ठाण्यात दाखल केली आहे.

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवारांच्या स्वप्नातील
# सक्षम ग्रामीण युवक घडविण्यासाठी 'अजित करिअर अकॅडमी'ची मुहूर्तमेढ

**काऱ्हाटी (दै. संध्या)**

ग्रामीण भागातील युवक-युवतींना गुणवत्तापूर्ण भरतीपूर्व प्रशिक्षण उपलब्ध करून देत त्यांच्यामध्ये शिस्त,आत्मविश्वास,नेतृत्वगुण आणि राष्ट्रसेवेची भावना विकसित व्हावी, या व्यापक सामाजिक ध्येयातून कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, काऱ्हाटी यांच्या वतीने 'अजित करिअर अकॅडमी' ची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री दिवंगत मा. अजितदादा पवार साहेब यांनी पाहिलेल्या सक्षम, सुसंस्कृत, कर्तव्यदक्ष आणि शासकीय सेवेसाठी सज्ज ग्रामीण युवक घडविण्याच्या दूरदृष्टीला प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम संस्थेने हाती घेतला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, काऱ्हाटी च्या अध्यक्षा मा.श्रीमती सुनेत्रावहिनीसाहेब अजितदादा पवार तसेच संस्थेचे विश्वस्त व राज्यसभा खासदार मा.श्री.पार्थदादा अजितदादा पवार यांच्या प्रेरणा, मार्गदर्शन आणि संकल्पनेतून साकार झालेली ही अकॅडमी ग्रामीण भागातील युवक-युवतींसाठी शासकीय सेवेकडे वाटचाल करण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे.

आजच्या तीव्र स्पर्धेच्या युगात ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये क्षमता,जिद्द आणि गुणवत्ता असूनही योग्य मार्गदर्शन,नियोजनबद्ध प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक वातावरणाचा अभाव जाणवतो.ही उणीव दूर करण्याच्या उद्देशाने अकॅडमीमध्ये पोलीस भरती,सैन्य भरती,वनरक्षक भरती, राज्य उत्पादन शुल्क सिपाई भरती, कर्मचारी निवड आयोग (Staff Selection Commission – SSC) अंतर्गत विविध भरती,तलाठी,ग्रामसेवक तसेच इतर विविध शासकीय भरती परीक्षांसाठी लेखी व मैदानी प्रशिक्षण,व्यक्तिमत्त्व विकास, शारीरिक तंदुरुस्ती, नियमित सराव परीक्षा (Mock Test), मुलाखत कौशल्य विकास आणि अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.आधुनिक प्रशिक्षण प्रणाली,गुणवत्तापूर्ण अध्यापन,शिस्तबद्ध वातावरण आणि विद्यार्थीकेंद्रित अभ्यासपद्धतीच्या माध्यमातून ग्रामीण युवकांना स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यशस्वी करण्याचा संस्थेचा मानस आहे.

ही अकॅडमी केवळ भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र नसून,ग्रामीण युवक-युवतींमध्ये राष्ट्रसेवा, सामाजिक बांधिलकी, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि शिस्त यांसारखी मूल्ये रुजविणारे व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र म्हणून विकसित करण्याचा संस्थेचा प्रयत्न राहणार आहे.गुणवत्तापूर्ण, जबाबदार आणि संवेदनशील शासकीय अधिकारी घडविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या उपक्रमाचा लाभ घेऊन आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि शासकीय सेवेतील यशस्वी कारकिर्दीसाठी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन संस्थेचे सचिव श्री. प्रफुल्ल तावरे यांनी केले आहे.

याबाबतची माहिती संस्थेचे कार्यकारी अधिकारी श्री. विकास निर्मळ यांनी दिली.



## खालुंब्रे येथे विशेष स्वच्छता मोहीम

**चाकण (दै. संध्या)**

खेड तालुक्यातील खालुंब्रे येथे विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत खालुंब्रे येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. याप्रसंगी खालुंब्रे ग्रामपंचायतीचे प्रशासक एस. एस. साळुंखे व आदर्श ग्रामपंचायत अधिकारी श्रीधर नाईकडे यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे यांच्या हस्ते व्यापक स्वच्छता आणि श्रमदानाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी पंडित पवार, सुदाम पवार, गणेश पवार, राजाराम खराबी, लक्ष्मण गुंड, नंदा तुळवे, शर्मिला बोत्रे, राजू बोत्रे, धनश्री पवार आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामपंचायतीचे वरिष्ठ कर्मचारी शिवाजी बोत्रे व ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन केले होते. ग्रामपंचायतीच्या वतीने कंपनी अधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. या मोहिमेत सर्व कर्मचारी बांधव, ग्रामस्थ व तरुण आणि महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. श्रीधर नाईकडे यांनी सांगितले की," गावामध्ये स्वच्छता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गाव सुंदर व टवटवीत राहण्यासाठी तरुणांचा सहभाग आवश्यक आहे. प्रदूषण टाळण्यासाठी स्वच्छता व वृक्षारोपणाची गरज आहे. ग्रामपंचायतीचे प्रशासक एस. एस. साळुंखे यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले.

## बारामतीत खळबळ; कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवर जीवघेणा हल्ला; आरोपींविरुद्ध कठोर गुन्हा दाखल, प्रतिबंधक कारवाईचा प्रस्ताव

**बारामती (दै. संध्या)**

बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील आमराई परिसरात दिनांक 10 जुलै 2026 रोजी पहाटे सुमारे 01.30 वा. दोन गटांमध्ये भांडण,मारामारी व गोंधळ सुरू असल्याची माहिती डायल 112 आपत्कालीन सेवा यंत्रणेद्वारे प्राप्त झाली. माहिती मिळताच बारामती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई गिरीश गणपत नेवसे व पोलीस शिपाई तुषार शिंदे हे तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

घटनास्थळी पोहोचल्यावर सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात येईल अशी परिस्थिती निर्माण झालेली होती.नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण होऊ नये तसेच सुरू असलेला गोंधळ वाढू नये यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून बेकायदेशीर जमाव पांगविण्याचा,दंगा शमविण्याचा आणि कायदा सुव्यवस्था कायम राखण्याचा प्रयत्न केला.

मात्र आरोपी शुभम भीमराव कांबळे, विपुल अजय अवचिते, शुभम अजय अवचिते, ओम मिथुन पाटोळे, गणेश शंकर पाथरकर व त्यांच्या इतर साथीदारांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर आदेशांचे उल्लंघन करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. आरोपींनी पोलिसांना धमकावून त्यांच्याविरुद्ध फौजदारीपात्र बलप्रयोग केला. या घटनेत पोलीस शिपाई गिरीश नेवसे यांना दुखापत झाली असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आले आहेत.

कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी घटनास्थळी धावून गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्यावर झालेला हा हल्ला गंभीर स्वरूपाचा मानला जात आहे. कायदा सुव्यवस्था राखताना पोलीस अधिकारी व कर्मचारी अनेकदा स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करतात. समाज सुरक्षित राहावा, नागरिक निश्चिंतपणे आपले दैनंदिन जीवन जगू शकावेत आणि कायद्याचे राज्य अबाधित राहावे यासाठी पोलीस दल दिवस-रात्र कार्यरत असते.

या प्रकरणी आरोपी शुभम भीमराव कांबळे, विपुल अजय अवचिते, शुभम अजय अवचिते, ओम मिथुन पाटोळे, गणेश शंकर पाथरकर व त्यांच्या इतर साथीदारांविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम 115(1), 121(1), 132, 195(1), 221, 3(5) तसेच आर्म्स अ‍ॅक्ट कलम 4, 25 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपींच्या गुन्हेगारी वर्तनाचा स्वतंत्र आढावा घेण्यात येत असून त्यांच्याविरुद्ध आवश्यक त्या कायदेशीर प्रतिबंधक कारवायांची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या आणि लोकसेवकांवर हात उचलणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

सदर गुन्ह्याचा तपास बारकाईने सुरू असून घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल व्हिडिओ, इलेक्ट्रॉनिक पुरावे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब तसेच इतर तांत्रिक व वैज्ञानिक पुरावे संकलित करण्यात येत आहेत. उपलब्ध पुराव्यांच्या आधारे न्यायालयात सक्षम दोषारोपपत्र सादर करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण श्री. संदीप सिंह गिल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती विभाग श्री. चैतन्य कदम आणि पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री भंडारे यांच्याकरवी करण्यात येत असून गुन्ह्याचा पुढील तपास बारामती शहर पोलीस स्टेशनमार्फत सुरू आहे.

## डेहने येथे उपजिल्हा रुग्णालयासाठी अधिवेशनात मागणी : आमदार बाबाजी काळे

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील डेहने येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर करण्याची मागणी आमदार बाबाजी काळे यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित केली आहे.

तालुक्यातील आदिवासी व दुर्गम परिसरातील नागरिकांच्या आरोग्य सुविधांचा प्रश्न उपस्थित करत आमदार बाबाजी काळे यांनी डेहने येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर करण्याची मागणी करत म्हणाले की, खेड तालुक्याच्या पश्चिम भागात सुमारे २५ टक्के आदिवासी समाज वास्तव्यास असून या परिसरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यात अनेक अडचणी येत आहेत.




डेहने येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असले तरी वाढती लोकसंख्या आणि विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्र लक्षात घेता येथे उपजिल्हा रुग्णालयाची अत्यंत गरज आहे.

यापूर्वीही ही मागणी करण्यात आली होती; मात्र आवश्यक जागा उपलब्ध नसल्याने प्रस्तावास मान्यता मिळू शकली नाही. त्यामुळे आवश्यक जागा उपलब्ध करून शासनाने उपजिल्हा रुग्णालयासाठी निधी मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी केली.

या मागणीवर उत्तर देताना महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक भूमिका घेत, डेहने येथे आवश्यक जागा उपलब्ध होताच उपजिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात येईल, असे आश्वासन विधानसभेत दिले.

## जिजामाता विद्यालयात विद्यार्थ्यांचा पालखी सोहळा उत्साहात

**जेजुरी (दै. संध्या)**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून जेजुरी (ता. पुरंदर) येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच जिजामाता प्राथमिक विद्यालय जेजुरी येथे विद्यार्थ्यांचा पारंपरिक पालखी सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थी, विठ्ठल नामाचा अखंड गजर, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि पालखी मिरवणुकीमुळे संपूर्ण विद्यालय परिसर विठ्ठलमय झाला होता.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे आणि पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, वासुदेव तसेच इतर संतांची आकर्षक वेशभूषा साकारली होती. मुलांच्या हातात भगवे ध्वज, मुलींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन, कपाळी बुक्का, गळ्यात टाळ आणि पारंपरिक वारकरी पोशाख यामुळे विद्यालय परिसरात जणू पंढरपूरची वारी अवतरल्याचा अनुभव उपस्थितांना आला.

पालखी मिरवणुकीनंतर विद्यालयाच्या क्रीडांगणावर वारकरी परंपरेतील रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शिक्षक व विद्यार्थ्यांनी "जय जय राम कृष्ण हरी", "ज्ञानोबा माऊली तुकाराम", "रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी" यांसारख्या अभंगांच्या गजरात टाळ-वीणेच्या साथीने नृत्य, फुगडी आणि हरिनाम संकीर्तन केले. संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता. शेवटी विठ्ठलाची भजने आणि पसायदानाने या दिंडी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे नियोजन पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे, सोमनाथ उबाळे, सोनबा दुर्गाडे, राजाराम पिसाळ, सागर चव्हाण,कैलास सोनवणे, योगेश घोरपडे, राघू हारुळे, अजय जगताप, पांडुरंग आटोळे,निर्मला निगडे, शोभा पठारे, राजेंद्र ताम्हाणे, अमृता कांबळे, ज्योती खारतोडे आणि मोनिका निगडे यांनी केले.

## खुनाचा प्रयत्न प्रकरणातील चार महिन्यांपासून फरार आरोपीला कोंबिंग ऑपरेशनमध्ये अटक

**बारामती (दै. संध्या)**

बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील अत्यंत गंभीर स्वरूपाच्या गुन्हा रजिस्टर क्रमांक ८५/२०२६ मधील पाहिजे आरोपी श्याम विलास सकट यास बारामती शहर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या विशेष कोंबिंग ऑपरेशन दरम्यान ताब्यात घेऊन अटक केली आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून सुमारे चार महिन्यांहून अधिक कालावधीपर्यंत फरार राहिलेल्या या आरोपीस अखेर कायद्याच्या कचाट्यात आणण्यात बारामती शहर पोलिसांना यश आले आहे.

सदर गुन्हा दिनांक ०५ मार्च २०२६ रोजी बारामती येथील इंदापूर चौक परिसरातील हॉटेल गोकुळ येथे घडला होता. फिर्यादी आशिष प्रदीप केकाण यांच्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करून गंभीर दुखापत करण्यात आल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०९, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) तसेच शस्त्र अधिनियम कलम ४ व २५ अन्वये बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान जखमीस भाग्यजय हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. वैद्यकीय अहवालानुसार फिर्यादीच्या डोक्यावर व शरीरावर गंभीर स्वरूपाच्या जखमा झालेल्या असल्याचे निष्पन्न झाले. या गुन्ह्यातील एका विधिसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात येऊन त्याच्याकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेला कोयता जप्त करण्यात आला होता. त्यानंतर बाल न्याय मंडळ, पुणे यांनी संबंधित बालकास निरीक्षणगृह, येरवडा येथे ठेवण्याचे आदेश दिले होते.

मात्र या गुन्ह्यातील प्रमुख आरोपी श्याम विलास सकट हा गुन्हा दाखल झाल्यापासून दिनांक ०५/०३/२०२६ ते १०/०७/२०२६ या कालावधीत सतत फरार होता. त्याचा शोध घेण्यासाठी बारामती शहर पोलिसांनी वेळोवेळी विविध ठिकाणी शोधमोहीम राबविली, नातेवाईक व ओळखीच्या व्यक्तींकडे चौकशी केली तसेच माननीय न्यायालयामार्फत त्याच्याविरुद्ध जाहीरनामा प्रसिद्ध



करण्यात आला होता. तरीदेखील आरोपी जाणीवपूर्वक पोलिसांना चकवा देत लपून राहत होता.

दरम्यान, दिनांक १० जुलै २०२६ रोजी बारामती शहर पोलीस स्टेशनकडून आमराई परिसरात विशेष कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. यावेळी गोपनीय बातमीदारामार्फत प्राप्त झालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे आरोपी श्याम विलास सकट हा आमराई परिसरातील एका घरामध्ये लपून बसल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तात्काळ सापळा रचून त्यास ताब्यात घेतले व विधीवत अटक केली.

सदर कोंबिंग ऑपरेशनमध्ये पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप भंडारे, पोलीस हवालदार रामचंद्र शिंदे, पोलीस हवालदार यशवंत पवार, पोलीस शिपाई संतोष जगताप, पोलीस शिपाई कविटके, पोलीस शिपाई दत्ता मदने, पोलीस शिपाई अक्षय सिताफ आणि पोलीस शिपाई अमोल देवकाते यांनी सक्रिय सहभाग घेतला.

अटक आरोपीस पुढील तपासासाठी ताब्यात घेऊन माननीय न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता, गुन्ह्याचे गांभीर्य, आरोपीचा दीर्घकाळ फरार राहण्याचा इतिहास तसेच तपासातील बाबी विचारात घेऊन माननीय न्यायालयाने त्यास न्यायालयीन कोठडी (Judicial Custody) मंजूर केली. त्यानुसार आरोपीची येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे रवानगी करण्यात आली आहे. प्राथमिक माहितीनुसार सदर आरोपी हा गावठी हातभट्टी दारू विक्रीसारख्या बेकायदेशीर कृत्यांमध्ये सराईतपणे सहभागी असल्याची माहिती समोर आली असून त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची अधिक पडताळणी व तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण श्री. संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती विभाग श्री. चैतन्य कदम आणि पोलीस निरीक्षक तथा प्रभारी अधिकारी श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक श्री. रत्नदीप भंडारे हे सदर गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

बारामती शहर पोलिसांकडून पुन्हा एकदा हे सिद्ध झाले आहे की, गुन्हा करून फरार राहणे म्हणजे कायद्यापासून सुटका नव्हे. गुन्हेगार कितीही काळ लपून बसला तरी त्याचा शोध घेऊन त्याला न्यायालयासमोर उभे करण्याची क्षमता आणि इच्छाशक्ती बारामती शहर पोलिसांकडे आहे.

बारामती शहर पोलीस स्टेशन नागरिकांच्या सुरक्षेसाठी,कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्यासाठी कटिबद्ध आहे.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# महिला स्वयंसहायता गटांमुळे देशात क्रांती - राज्यपाल

## '१०० सर्वाधिक प्रभावशाली महिलांचा सन्मान'; नीता अंबानी, स्मृती इराणी, झिया मोदी, नीरजा बिर्ला यांची उपस्थिती

■ मुंबई (दै. संध्या)

महिला स्वयंसहायता गटांमुळे देशातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाला गती लाभली असून ग्रामीण - आदिवासी महिलांच्या जीवनात क्रांतिकारक बदल झाले आहेत. गावोगावींच्या महिलांमध्ये नेतृत्वगुण विकसित होत आहेत. हे कार्य अधिक जोमाने होण्यासाठी समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले.

'फॉर्च्युन इंडिया' मासिकातर्फे देण्यात येणाऱ्या 'फॉर्च्युन इंडिया १०० मोस्ट पॉवरफुल वूमेन (सर्वाधिक प्रभावी महिला)' पुरस्काराचा आरंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत १० जुलै रोजी मुंबई येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते.

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते 'फॉर्च्युन इंडिया' मासिकाच्या नव्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

विविध क्षेत्रात नेतृत्वस्थानी असलेल्या महिलांना संबोधित करताना, राज्यपाल म्हणाले की, महिला स्वयंसहायता गटांमुळे स्वतःच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून इतरांना देखील प्रोत्साहन देणाऱ्या महिला अनेक ठिकाणी उदयास आल्या आहेत.

पूर्वी बँकेत जाण्यास देखील घाबरणाऱ्या त्रिपुरा येथील एका ग्रामीण महिलेने कालांतराने स्वतः अधिकाऱ्यांसमोर आत्मविश्वासाने पॉवर पॉईंट सादरीकरण केले त्यावेळी सर्व उपस्थित आश्चर्यचकित झाले होते. ती महिला 'बँक सखी' म्हणून आज अनेक महिलांना मदत करीत असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांकडील अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण (एनपीए) १ टक्क्यापेक्षाही कमी आहे. महिलांकडे गेलेला पैसे सुरक्षित असतो, असे त्यांनी सांगितले. देशातील ५० टक्के नागरिक महिला असल्यामुळे त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष करून 'विकसित भारता'चे लक्ष्य साध्य करता येणार नाही. त्यामुळे समाजातील शेवटच्या स्तरावरील महिलेपर्यंत पोहोचून तिचे सक्षमीकरण झाले पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.




आज महिला तळागाळापासून तर उद्योग जगतातील मोठमोठ्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आहेत. विकास प्रक्रियेत त्या केवळ सहभागी होत नसून परिवर्तनाच्या अग्रस्थानी आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी यावेळी केले.

यावेळी त्यांनी उपस्थितांना केंद्र शासनाच्या महिला सक्षमीकरणाच्या कार्याची माहिती दिली. मातेचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच माता मृत्युदर कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आल्याचे सांगून त्यांनी 'नारीशक्ती वंदन' अधिनियम व 'पोषण अभियान' उपक्रमाची माहिती दिली.

गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून महिलांचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनातर्फे एचपीव्ही लस देण्यात येत असल्याचे सांगून त्यांनी 'आयुष्मान भारत' योजना, 'जनऔषधी औषधालये, लखपती दीदी, नमो ड्रोन आदी योजनांची माहिती दिली.

सुरुवातीला राज्यपालांच्या हस्ते 'फॉर्च्युन इंडिया' मासिकाच्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. आरपी संजीव गोयंका समूहाचे उपाध्यक्ष शाश्वत गोयंका यांनी प्रास्ताविक केले तर 'फॉर्च्युन इंडिया'चे मुख्य संपादक सौरव मुजुमदार यांनी आभारप्रदर्शन केले.

उदघाटन सत्राला नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिषकुमार चौहान, रिलायन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी, माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, कॉर्पोरेट लॉ फर्म एझेडबी अँड पार्टनर्सच्या सह संस्थापिका झिया मोदी, नीरजा बिर्ला यांसह उद्योग, व्यवसाय, बँकिंग क्षेत्रातील प्रभावी महिला उपस्थित होत्या.

# थोडक्यात पण महत्वाचे

## मरेचा मुख्य मार्गिकेसह हार्बरवर उद्या मेगाब्लॉक!

मुंबई (दैनिक संध्या) : विविध अभियांत्रिकी आणि देखभालीसाठी मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने रविवारी (१२ जुलै) रोजी उपनगरीय मार्गांवर मेगाब्लॉक घेतला आहे. हा ब्लॉक मुख्य मार्गिकेवर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि विद्याविहार तसेच चुनाभट्टी/वांद्रे (अप आणि डाऊन) मार्गिकेवर सकाळी १०.५५ ते दुपारी १५.५५ वाजेपर्यंत आहे. मुंबई येथून सुटणाऱ्या धीम्या मार्गावरील गाड्या सीएसएमटी ते विद्याविहार स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवल्या जाणार आहेत. या गाड्या भायखळा, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला स्थानकांवर थांबणार आहेत. पुढे विद्याविहार स्थानकावर त्या डाऊन धीम्या मार्गावर वळवल्या जाणार आहेत. तसेच घाटकोपर येथून सुटणाऱ्या धीम्या मार्गावरील गाड्या विद्याविहार आणि सीएसएमटी स्थानकांदरम्यान जलद मार्गावर वळवल्या जातील. या गाड्या कुर्ला, शीव, माटुंगा, दादर, परळ आणि भायखळा स्थानकांवर थांबणार आहेत. सीएसएमटी ते चुनाभट्टी/वांद्रे डाऊन हार्बर लाईनवर सकाळी ११.४० ते दुपारी १६.४० वाजेपर्यंत आणि चुनाभट्टी/वांद्रे ते सीएसएमटी हार्बर अप लाईनवर सकाळी ११.१० ते सायंकाळी ४.१० वाजेपर्यंत हा मेगाब्लॉक आहे.



## मी राजकारणापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे : भूषण गवई

मुंबई (दैनिक संध्या) : 'मी राजकारणापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे,' असे स्पष्ट वक्तव्य भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी जळगाव येथील एका महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात केले. पुढे बोलताना भूषण गवई म्हणाले की, "महात्मा गांधी जसे सामान्य जनतेमध्ये राहिले, तसे आजच्या लोकप्रतिनिधींनीही लोकांमध्ये राहिले पाहिजे. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. जिल्हा परिषद सदस्य निवडून आल्यानंतर तो शहरात आपले घर थाटतो आणि त्याचा स्वतःचा मतदारसंघ हा केवळ 'व्हिजिटिंग' पुरता मर्यादित राहतो. त्यामुळे जनतेशी असलेली नाळ तुटत चालली आहे." ते पुढे म्हणाले, 'मी आता दिल्लीत राहत असलो तरी दररोज मराठी वृत्तपत्रे वाचतो. त्यामुळे माझी मातीशी असलेली नाळ कायम जोडलेली राहते. महापुराच्या बातम्या पाहिल्यानंतर या कार्यक्रमाला उपस्थित राहता येईल की नाही, अशी शंका होती. मात्र निसर्गाच्या अडचणी असूनही मी दिलेला शब्द पाळण्यासाठी येथे आलो आहे.'

## जिल्हा नियोजन बैठकीत पुन्हा पत्रकारांना प्रवेशबंदी

जळगाव (दैनिक संध्या) : जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाची मानली जाणारी जिल्हा नियोजन समितीची बैठक मंगळवारी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात ऑनलाइन पद्धतीने पार पडली. मात्र, याही बैठकीत पत्रकारांना प्रवेश नाकारण्यात आल्याने प्रशासनाच्या पारदर्शकतेबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. बैठकीदरम्यान पत्रकारांना सभागृहात प्रवेश करता येऊ नये यासाठी मुख्य प्रवेशद्वारावर पोलीस तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित महत्त्वाच्या चर्चेचे प्रत्यक्ष वृत्तांकन करण्यापासून माध्यम प्रतिनिधींना पुन्हा एकदा वंचित राहावे लागले. बैठकीत चालू आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ९००.०५ कोटी रुपयांच्या नियतव्ययास मंजुरी देण्यात आली. तसेच आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्राप्त झालेल्या ८३४.६२ कोटी रुपयांच्या निधीचा शंभर टक्के वापर झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. मात्र, बैठकीत लोकप्रतिनिधींनी कोणते मुद्दे उपस्थित केले, विविध विभागांच्या कामकाजाबाबत कोणत्या सूचना किंवा नाराजी व्यक्त करण्यात आली, अधिकाऱ्यांना कोणते निर्देश देण्यात आले आणि कोणत्या विकासकामांना प्राधान्य देण्यात आले, याची प्रत्यक्ष माहिती पत्रकारांना मिळू शकली नाही.

# अॅक्युपंक्चर उपचार शिक्षणाच्या विस्तारासाठी राज्य शासन प्रयत्नशील - मुख्यमंत्री

■ नागपूर (दै. संध्या)

अॅक्युपंक्चर उपचार पद्धतीतून असंख्य रूग्णांना आपल्या व्याधीपासून मुक्त होण्यास मदत झाली आहे. तेवीस-चोवीस वर्षांपूर्वी मी स्वतः पाठदुखीने त्रस्त असताना या उपचार पद्धतीने मला तंदुरुस्त होता आले. या ज्ञानशाखेच्या विस्तारासाठी व याचे शैक्षणिक मार्ग वृद्धींगत व्हावेत, या दृष्टीने राज्य शासन प्रयत्नशील असून शासकीय पातळीवर कोठेही कमतरता पडणार नाही, अशी निःसंदिग्ध ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्व्हेंन्शन सेंटर येथे आयोजित नॅशनल कॉन्फरन्स ऑन अॅक्युपंक्चर अॅक्यूकॉन 2026 च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी महाराष्ट्र काऊन्सील ऑफ अॅक्युपंक्चरचे डॉ. रूमी बेरामजी, इंडियन सोसायटी ऑफ मेडिकल अक्युपंक्चर या संस्थेचे अध्यक्ष डॉ. रमण कपूर यांच्यासह डॉ. नारायण नवले आणि डॉ. प्रदीप गुहा आदि मान्यवर उपस्थित होते.

सिईंग इज बिलिव्हींग अर्थात आपण प्रत्यक्ष जे डोळ्याने पाहतो, त्यावर विश्वास दृढ करतो. अॅक्युपंक्चर उपचार पद्धती ही अशीच अनुभूतीची उपचार पद्धती आहे. या सर्वसमावेशक उपचार पद्धती अंतर्गत आपण ही उपचार पद्धती महत्त्वाची मानली आहे. या क्षेत्रापुढे असलेल्या अडचणींची जाणीव असून शासनाच्या वतीने पूर्ण क्षमतेने या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करू, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ज्ञानशाखेला, उपचार पद्धतीला प्रतिष्ठा व शैक्षणिक मान्यता देण्यात दिलेले योगदान खूप महत्त्वपूर्ण आहे. वेळोवेळी त्यांनी आमची भूमिका समजून घेत शासनस्तरावर असलेल्या अडचणी दूर केल्या असून



त्यांच्या सहकार्यानेच महाराष्ट्रात ४ हजार ५०० पेक्षा अधिक नोंदणीकृत तज्ज्ञ अक्युप्रेशरची सेवा देत आहेत. यात साठ टक्के संख्या ही महिलांची असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे डॉ. रूमी बेरामजी यांनी यावेळी सांगितले. डॉ. रमन कपूर यांनीही मनोगतात शासनाच्या योगदानाला अधोरेखित केले.

# ज्येष्ठ नागरिकांच्या तीर्थदर्शन यात्रेची इच्छापूर्ती होते याचा मनस्वी आनंद - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नागपूर येथून मुख्यमंत्री तीर्थदर्शन यात्रेचा शुभारंभ

■ नागपूर (दै. संध्या)

भगवान गौतम बुद्धाच्या विचाराचे प्रेरणास्त्रोत म्हणून आपण बोधगया येथे जातो. एकदा तरी तेथे जाऊन दर्शन घेण्याची ओढ भाविकांमध्ये असते. ज्येष्ठ नागरिकांच्या दर्शनाची इच्छा पूर्ण व्हावी, या दृष्टीने आपण मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरु केली. नागपूर येथून या योजनेअंतर्गत यावर्षी सुमारे 800 भाविकांना जाता येत आहे, याचा मनस्वी आनंद असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर रेल्वे स्थानक येथून बोधगयेकडे जाणाऱ्या भाविकांच्या पहिल्या चमूला शुभेच्छा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष समारंभात ते बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, संजय मेश्राम, समीर मेघे, चरणसिंह ठाकूर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अनेक ज्येष्ठ नागरिकांना आपल्या श्रद्धेच्या तीर्थस्थळी जाऊन दर्शन घेण्याची तीव्र इच्छा असते. आर्थिक, शारीरिक आणि कौटुंबिक अडचणींमुळे त्यांची ही इच्छा पूर्ण



होणे अशक्यप्राय होऊन जाते. अशा गरजू ज्येष्ठ नागरिकांना आपल्या तीर्थस्थळाच्या दर्शनाची इच्छा पूर्ण व्हावी, या दृष्टीने शासनाने ही योजना आकारास आणली. आज या योजनेअंतर्गत असंख्य भाविकांना त्याचा लाभ होत आहे. सामाजिक न्याय विभागाने अतिशय उत्तमरित्या ही योजना राबविल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विभागाचे कौतुक केले. भाविकांच्या इच्छापूर्तीचा आनंद हा या योजनेची खरी यशस्वीता आहे. या यात्रेत कोणत्याही वृद्ध भाविकांची गैरसोय होऊ नये,या दृष्टीने सामाजिक न्याय विभागाने काळजी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आपण लवकरच बोधगया येथे महाराष्ट्रातील भाविकांसाठी व्यापक संकूल निर्माण करीत असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी देऊन भाविकांना शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व मान्यवरांच्या हस्ते बोधगया येथे भाविकांना घेऊन जाणाऱ्या विशेष रेल्वेला हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले.

# व्हिबी – जीरामजी' मध्ये ग्रामीण भागाच्या उत्थानाची क्षमता - मंत्री भरत गोगावले

■ मुंबई (दै. संध्या)

विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) २०२६' अर्थात व्हिबी - जीरामजी कायद्याविषयी कार्यशाळा विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात ८ जूलै रोजी पार पडली. या कार्यशाळेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती.

'व्हिबी - जीरामजी' योजनेमुळे ग्रामीण भागातील लाखो कुटुंबांना थेट प्रगतीच्या प्रवाहात आणले आहे. व्हीबी -जीरामजी या योजनेमध्ये माध्यमातून ग्रामीण भारताचे उत्थान करण्याची क्षमता आहे, असे उद्गार रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी व्हिबी-जीरामजी कायद्यावर प्रकाश टाकताना काढले.

कार्यशाळेच्या शुभारंभीय कार्यक्रमाला व्यासपीठावर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, आमदार तथा रोजगार हमी योजना समिती प्रमुख सुनील शेळके, केंद्रीय ग्रामविकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे आणि सचिव अप्पासो धुळाज उपस्थित होते. मंत्री गोगावले म्हणाले, या योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीत अत्यंत तत्परता दाखवत केवळ ८ दिवसांच्या विक्रमी कालावधीत अधिसूचना काढून यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात आले आहे.



राज्यात प्रभावीपणे राबवली जाणारी 'मातोश्री पांदन रस्ते योजना' आज देशपातळीवर आदर्श ठरत असून ही महाराष्ट्रासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. ग्रामीण जनतेला अधिक आर्थिक स्थैर्य देण्यासाठी आता रोजगार हमीच्या दिवसांत २५ दिवसांची अतिरिक्त वाढ करून ती १२५ दिवस करण्यात आली आहे.

यात कुशल, अर्धकुशल आणि अकुशल अशा सर्व प्रकारच्या कामांचा समावेश असून कामांची व्याप्ती २६६ वरून थेट ३१८ पर्यंत वाढवून विकासाला गती देण्यात आली आहे. तसेच मुख्य शेती हंगामात ६० दिवसांचा अवकाश (खंड) देण्याचा दूरगामी निर्णय घेण्यात आला असून, राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत या योजनेचा लाभ पोहोचवला जाईल, असा विश्वासही मंत्री गोगावले यांनी व्यक्त केला.

केंद्रीय ग्रामविकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे म्हणाल्या, महाराष्ट्र हा रोजगार हमी योजनेचा उद्गाता आहे. व्हीबी -जीरामजी हा सक्षम कायदा १ जुलै रोजीच संपूर्ण देशात लागू करण्यात आला आहे. हा कायदा विक्रमी वेळेत देशभरात लागू झाला असून, यासाठी केंद्र सरकार ६० टक्के आणि राज्य सरकार ४० टक्के निधी देणार आहे. या अंतर्गत प्रत्येक राज्यासाठी निश्चित असे 'स्टेट वाईज नॉर्मेटिव्ह अलोकेशन' ठरवण्यात आले आहे. ग्रामीण विकासाला नियोजित स्वरूप देण्यासाठी पुढील पाच वर्षांत प्रत्येक ग्रामपंचायतीने आपला स्वतंत्र 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' तयार करावा. योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी आता मजुरांची हजेरी 'चेहरा ओळख प्रणाली' द्वारे घेतली जात आहेत. दुर्गम भागात इंटरनेटची सुविधा नसतानाही ही प्रणाली ऑफलाइन पद्धतीने काम करू शकते. तसेच, सर्व कामांचे ग्रामसभेमार्फत 'सामाजिक अंकेक्षण' करणे आवश्यक आहे, असेही श्रीमती भाजीभाकरे यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या ३१८ कामांमध्ये ग्रामीण भागाच्या मूलभूत गरजांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. यामध्ये पाणी टंचाई निवारणासाठी १०७ कामे जलसंधारणाची, ८६ कामे ग्रामीण भागातील नागरिकांच्या आजीविका बाबत, नैसर्गिक आपत्तीशी मुकाबला करण्यासाठी ३७ कामे आपत्ती व्यवस्थापनाची आणि ८८ कामे ग्रामीण पायाभूत सुविधांची समाविष्ट आहेत. यामध्ये २२१ नवीन कामे आणि ९७ दुरुस्तीच्या कामांनाही मंजुरी असणार आहे.

यावेळी सहसचिव रोहिणी भाजीभाकरे यांनी आमदार महोदयांच्या शंकांचे निरसन केले. कार्यशाळेला मंत्री, राज्यमंत्री, आमदार, अधिकारी उपस्थित होते.

# महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतील ‘पुणे प्रथम-सेवावारी २०२६’ अंतर्गत सामूहिक ऑनलाईन पसायदानाला देश-विदेशातून उत्स्फूर्त प्रतिसाद

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून उपक्रमाचे कौतुक; लाखो भाविकांनी विश्वशांतीच्या प्रार्थनेत मिसळला स्वर

पुणे (दै. संध्या)

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या विश्वकल्याणाच्या संदेशाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा ताई नागपुरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या ‘पुणे प्रथम-सेवावारी २०२६’ अंतर्गत आयोजित सामूहिक ऑनलाईन पसायदान पठणाला देश-विदेशातील लाखो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शुक्रवारी (दि. १०) रात्री ९ वाजता भवानी पेठ येथील संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखी मुक्कामस्थळ तसेच जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी मुक्कामस्थळी सामूहिक पसायदानाचे पठण करण्यात आले.

टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि “ज्ञानोबा-तुकाराम”च्या अखंड जयघोषात “आता विश्वात्मके देवे...” या पसायदानाच्या मंगल स्वरांनी संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून गेले. प्रत्यक्ष उपस्थित हजारो वारकरी तसेच डिजिटल माध्यमातून पुणे, महाराष्ट्र आणि देश-विदेशातील लाखो भाविकांनी विश्वशांती, मानवता आणि सर्वांच्या कल्याणासाठी एकत्रित प्रार्थना केली.



यावेळी केंद्रीय सहकार व विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार हेमंत रासने, महापौर मंजुषा ताई नागपुरे, स्थायी समिती सभापती श्रीनाथ भीमाले, सभागृहनेते गणेश बिडकर, आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपआयुक्त माधव जगताप, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी प्रमुख राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ, चैतन्य लोंढे, डॉ. रोहिणी पवार, पुरुषोत्तम पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी महापौर मंजुषा ताई नागपुरे म्हणाल्या, “संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान ही केवळ प्रार्थना नसून संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा सार्वकालिक संदेश आहे. ‘पुणे प्रथम-सेवावारी २०२६’च्या माध्यमातून परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाची प्रभावी सांगड घालत वारकरी संप्रदायाचा समता, सेवा, भक्ती आणि विश्वबंधुत्वाचा विचार देश-विदेशातील प्रत्येक भाविकापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. सामूहिक पसायदानाच्या माध्यमातून विश्वशांती, सामाजिक सलोखा आणि मानवतेचा संदेश अधिक दृढ व्हावा, हीच आमची मनापासूनची अपेक्षा आहे.”

महापौर मंजुषा ताई नागपुरे यांनी सांगितले की, आषाढी वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून सेवा, समता, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्याचा जीवनमंत्र आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातील विश्वकल्याणाचा संदेश आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगभर पोहोचविण्याचा हा अभिनव प्रयत्न असून प्रत्येक घरात, प्रत्येक मनात आणि जगभरातील प्रत्येक भाविकापर्यंत विश्वशांतीची प्रार्थना पोहोचावी, हीच या उपक्रमामागील प्रेरणा आहे.

या उपक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाल्याबद्दल महापौरांनी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे तुळशीचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. यामधून पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि संतपरंपरेतील निसर्गप्रेमाचा संदेश देण्यात आला.

प्रत्यक्ष आणि डिजिटल अशा दोन्ही माध्यमांतून झालेला हा व्यापक सहभाग वारकरी परंपरेचे जागतिक स्वरूप, संतवाङ्मयाविषयी समाजातील अढळ श्रद्धा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अध्यात्माशी जोडले जाण्याची वाढती जाणीव अधोरेखित करणारा ठरला. विश्वशांती, मानवता आणि समतेचा संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमाला लाभलेला देश-विदेशातील उत्स्फूर्त प्रतिसाद हा ‘पुणे प्रथम-सेवावारी २०२६’ च्या यशस्वी वाटचालीतील महत्त्वाचा मैलाचा दगड ठरला.

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून उपक्रमाचे कौतुक

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे भवानी पेठेतील मुक्कामस्थळी दर्शन घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापौर मंजुषा ताई नागपुरे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक ऑनलाईन पसायदान उपक्रमाचे विशेष कौतुक केले. यावेळी ते म्हणाले, “संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातून विश्वबंधुत्व, मानवता आणि सर्वांच्या कल्याणाचा संदेश जगाला मिळाला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा संदेश घराघरात आणि जगभर पोहोचविणारा हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. परंपरा आणि तंत्रज्ञानाचा असा सुंदर संगम वारकरी संप्रदायाचा विश्वबंधुत्वाचा संदेश नव्या पिढीपर्यंत आणि जागतिक स्तरावर पोहोचविण्यास निश्चितच मोलाची भूमिका बजावेल.”

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वारकऱ्यांना नगरसेवक रफिक शेख यांच्या हस्ते फराळ आणि पाणी बॉटल्स वाटप

पुणे (दैनिक संध्या) : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पुण्यात पालखी विसावा मध्ये आलेल्या वारकरी संप्रदायांना भवानी पेठ चुडामन तालीम येथे प्रभाग क्रमांक 22 मधील स्थानिक नगरसेवक रफिक शेख मित्र परिवाराच्या वतीने वारकऱ्यांना राजगिरा लाडू, बिस्किटे, उपवासाचा चिवडा, पाण्याचे बॉटल्स आदीचे वाटप करण्यात आले होते. यावेळी कार्यकर्ते पदाधिकारी आदींची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रस्त्यावरचे झाड अंगावर पडल्यामुळे महिला गंभीर जखमी

पुणे (दैनिक संध्या) : पर्वती गाव, पुणे मारूती मंदिराच्या रस्त्यावर एक भले मोठे झाड पडले असून त्या झाडाखाली सौ. उज्वला मारूती पोळेकर, वय : ५१, रा. जनता वसाहत, दत्त मंदिरजवळ पर्वती, पुणे येथील रहिवासी असून या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने भारती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्यांचेवर उपचार चालू आहेत, पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने याची दखल घ्यावी अशी मागणी नागरिक करीत आहेत.

### लालमहालात भक्तीचा जागर; 12 तासांच्या अखंड कीर्तनमालेत वारकरी झाले तल्लीन

पुणे (दैनिक संध्या) : देवाचिये द्वारी उभा क्षणभरी... यांसारख्या ओव्यांचे अर्थ कीर्तनाद्वारे सांगण्यासह ज्ञानोबा माऊली, तुकारामच्या नामघोषाने शेकडो वारकऱ्यांच्या उपस्थितीत ऐतिहासिक लालमहालाचा परिसर दुमदुमला. वारकऱ्यांसाठी पुण्यात सलग १२ तास अखंड कीर्तनमालेचे आयोजन करण्यात आले होते. कसबा पेठेतील लालमहाल येथे सलग ८ नारदीय कीर्तनांच्या कीर्तनमालेत समरसता आणि संतपरंपरेचे दर्शन घेण्यासाठी वारकरी भक्तांनी गर्दी केली. शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी, संस्कार भारती पश्चिम प्रांत आणि पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेतर्फे महाराष्ट्र शाहीर जंगम स्वामी यांच्या स्मरणार्थ सलग १२ तास अखंड कीर्तनमालेचे आयोजन केले होते. कीर्तनमालेचे उद्घाटन लालमहालाचे सुरक्षारक्षक सोमनाथ भोंडे, अश्विनी ससाणे, तसेच पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे स्वच्छता कर्मचारी सुनील भंडगे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी आणि तुकाराम गाथेचे पूजन करून झाले. प्रबोधिनीचे अध्यक्ष शाहीर हेमंतराजे मावळे, प्रा. संगीता मावळे, संस्कार भारतीचे पश्चिम प्रांत महामंत्री प्रशांत कुलकर्णी, पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड आदी उपस्थित होते. कीर्तनमालेत अनुक्रमे कीर्तनकार श्रेयस बडवे, विकास दिग्रसकर, प्रा. संगीता मावळे, महेश काणे, वासुदेव बुरसे, डॉ. चारुदत्त आफळे, शेखर व्यास, सुहास देशपांडे यांचे कीर्तन सादर केले. संतपरंपरा, वारी, तसेच भक्तीचे महत्त्व आणि माहात्म्य कीर्तनकारांनी आपल्या कीर्तनातून सांगितले. उपेंद्र शितुत, केदार टिळेकर, पल्लवी पिळणकर, होनराज मावळे यांनी साथसंगत केली.




## भाजप वैद्यकीय आघाडीतर्फे पालखी सोहळ्यासाठी फिरता दवाखाना

सासवड (दै. संध्या)



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली आणि संत सोपानकाका महाराजांच्या पालखी सोहळ्यानिमित्त पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुणे जिल्हा भाजप वैद्यकीय आघाडीने पुढाकार घेतला आहे. या दोन्ही सोहळ्यासोबत अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'फिरता दवाखाना' (रुग्णवाहिका) उपलब्ध करण्यात आला आहे. सासवड (ता.पुरंदर) येथे आयोजित कार्यक्रमात या रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले.

या दोन्ही रुग्णवाहिकांमध्ये प्रत्येकी दोन तज्ज्ञ डॉक्टर, दोन परिचारिका आणि अत्यावश्यक औषधांचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. या फिरत्या दवाखान्यात रक्त संकलन, ईसीजी सुविधा आणि रक्तदाब तपासणी यांसारख्या महत्त्वाच्या आरोग्य सुविधा वारकऱ्यांना तत्काळ मिळणार आहेत.

वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुमित काकडे यांनी सांगितले की, माजी आमदार संजय जगताप आणि भाजप जिल्हाध्यक्ष शेखर वढणे यांच्या विशेष सहकार्यातून वारकऱ्यांसाठी ही अत्याधुनिक 'कार्डियाक' रुग्णवाहिका उपलब्ध झाली आहे. याप्रसंगी माजी आमदार संजय जगताप, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, पुरंदर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रवीण जगताप, नीरा मार्केट कमिटीचे सभापती संदीप फडतरे, भाजप शहराध्यक्ष आनंद जगताप यांच्यासह गटनेते अजित जगताप, नगरसेवक राजन जगताप, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर गिरमे, नगरसेविका स्मिता जगताप, अर्चना जगताप, लिना वढणे यांसह अनेक मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.

## आषाढी वारीचा बाजारात उत्साह; दिंड्यांच्या खरेदीने मार्केट यार्डात ५ कोटींची उलाढाल

पुणे (दै. संध्या)

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या कानाकोपऱ्यातून दाखल झालेल्या दिंड्यांनी शुक्रवारी पुढील पंधरा दिवसांसाठी लागणारा शिधा गुलटेकडी मार्केट यार्डातून मोठ्या प्रमाणात खरेदी केला. त्यामुळे बाजारात चार ते पाच कोटींची उलाढाल झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसोबत पंढरपूरकडे जाणाऱ्या शेकडो दिंड्यांचा पुण्यात दोन दिवस मुक्काम असतो. या काळात दिंडीचालक आणि सेवेकरी पुढील १५ दिवसांच्या प्रवासासाठी लागणारा किराणा, भाजीपाला, मसाले आणि इतर जीवनावश्यक साहित्य मोठ्या प्रमाणावर मार्केट यार्डातून खरेदी करतात.

मागील दोन दिवसांत भुसार विभागात तांदूळ, गहू, ज्वारी, तूरडाळ, धणे, जिरे, गरम मसाला, चहा, गूळ, रवा, मैदा आदी वस्तूंना मोठी मागणी राहिली. दरम्यान, अनेक दिंड्या एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर खरेदी करत असल्याने गोदामांतून मालाची सतत वाहतूक सुरू असल्याचे चित्र भुसार बाजारात दिसून आले. भाजीपाला विभागात कांदा, बटाटा, कोबी, फ्लॉवर, वांगी, भेंडी आणि इतर भाज्यांची मोठ्या प्रमाणावर विक्री झाली.

## संत तुकाराम महाराज पालखीचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केले सारथ्य

पुणे (दै. संध्या)

आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांनी आज पहाटे पुण्यातून पंढरपूरकडे प्रस्थान केले. उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी आषाढी वारीनिमित्त निवडुंगा विठोबा मंदिर, भवानी पेठ येथे जगद्गुरू संत तुकोबारायांच्या पालखीचे दर्शन घेतले, याप्रसंगी पहाटे सहा वाजता उपमहापौर वाडेकर यांच्या हस्ते काकड आरती संपन्न झाली. यानंतर जगद्गुरू संत तुकोबारायांच्या पादुकांचे दर्शन घेत त्यांनी सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. तसेच भवानी पेठ ते पुलगेट दरम्यान पालखी रथाचे सारथ्य वाडेकर यांनी केले



यावेळी देहू संस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे महाराज यांच्या शुभहस्ते उपमहापौर परशुराम वाडेकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच पालखी सोहळ्याच्या परंपरेनुसार पालखीचे स्वारस्य (मानाचा सन्मान) उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या प्रसंगी माजी नगरसेवक विशाल धनवडे, देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, ट्रस्टचे पदाधिकारी, वारकरी, भाविक तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उपमहापौर यांनी संत श्रेष्ठ ज्ञानदेव महाराज पालखीचे पालखी विठोबा मंदिर भवानी पेठ येथे दर्शन घेतले यावेळेस संत ज्ञानेश्वर महाराज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी उपमहापौर वाडेकर यांचा सन्मान केला.

## राष्ट्रवादी कॉँग्रेसचे कॉँग्रेसमध्ये विलीनीकरण नाही; सुप्रिया सुळे यांनी चर्चांना दिला पूर्णविराम

पुणे (दै. संध्या)

राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे कॉँग्रेसमध्ये विलीनीकरण होणार असल्याच्या राजकीय चर्चांना खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी फेटाळून लावले. कॉँग्रेस आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस यांच्यात विलीनीकरणाबाबत कोणतीही चर्चा झालेली नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच, पक्षात कोणतीही नाराजी नसल्याचा दावा करीत त्यांनी सुरू असलेल्या तर्क-वितर्कांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

पत्रकारांशी संवाद साधताना सुळे म्हणाल्या, 'आमची व कॉँग्रेसची विलिनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा झालेली नाही. माध्यमांमध्ये किंवा राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नाही.' त्यामुळे राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष कॉँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चांना कोणताही आधार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पक्षातील अंतर्गत नाराजीबाबत विचारले असता सुळे यांनी मिश्किल शैलीत उत्तर दिले. 'पक्षात कोणीही नाराज नाही आणि कोणी नाराज असेल, तरी तो बाहेर येऊन बोलणार नाही,' असे त्या म्हणाल्या. त्याचबरोबर पक्षात सर्व काही सुरळीत असल्याचा संदेश देण्याचाही त्यांनी प्रयत्न केला.

कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी नुकतेच राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि कॉँग्रेस यांच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर सुळे यांनी भूमिका स्पष्ट करीत विलीनीकरणाचा कोणताही प्रस्ताव किंवा चर्चा नसल्याचे सांगितले. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या भविष्यातील राजकीय समीकरणांबाबत निर्माण झालेल्या तर्कांना त्यांनी उत्तर दिले.

महाविकास आघाडीतील घटकपक्षांमध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर समन्वयाचे राजकारण सुरू असल्याचे मान्य करतानाच त्याचा अर्थ पक्षांचे विलीनीकरण असा होत नसल्याचेही त्यांच्या वक्तव्यातून स्पष्ट झाले. निवडणुकांमध्ये जागा वाटप, प्रचार आणि रणनीतीच्या पातळीवर सहकार्य होऊ शकते; मात्र प्रत्येक पक्षाचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व कायम राहील, असे संकेत त्यांनी दिले. सुळे यांच्या या स्पष्टीकरणामुळे महाविकास आघाडीतील राजकीय समीकरणांबाबत सुरू असलेल्या चर्चांना काही प्रमाणात विराम मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मुसळधार पावसानंतर चाकण शहरातील पूरसदृश परिस्थिती नियंत्रणात

चाकण (दै. संध्या)

गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तसेच शहरातील नैसर्गिक ओढ्यांवरील अतिक्रमणे आणि पुणे - नाशिक महामार्गावरील निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे चाकण शहरातील अनेक भागांमध्ये निर्माण झालेली पूरसदृश परिस्थिती नियंत्रणात आली आहे.

चाकण मध्ये अनेक नागरिकांच्या घरांमध्ये, दुकाने व व्यावसायिक आस्थापनांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. नागरिकांना मोठ्या हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या. या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घेत चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा सुरेशभाऊ गोरे तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व चाकण नगरपरिषदेचे शिवसेनेचे गटनेते नितीन गोरे यांनी शहरातील विविध पूरग्रस्त भागांना प्रत्यक्ष भेटी देऊन परिस्थितीची पाहणी केली. नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना युद्धपातळीवर मदतकार्य सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

नागरिकांना तात्काळ दिलासा मिळावा, यासाठी अनेक ठिकाणी पाणी उपसण्यासाठी पंप उपलब्ध करून देण्यात आले. स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून साचलेल्या पाण्याचा निचरा, ड्रेनेज व नाल्यांची साफसफाई, आवश्यक यंत्रसामग्री व मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, वाहतूक सुरळीत करण्यासाठी समन्वय साधणे तसेच पूरग्रस्त नागरिकांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. या तत्पर उपाययोजनांमुळे अनेक भागांतील साचलेले पाणी कमी होऊन शहरातील परिस्थिती नियंत्रणात आली आहे.



भविष्यात अशा प्रकारची पूरसदृश परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, यासाठी कायमस्वरूपी ठोस उपाययोजना राबविण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

शहरातील नैसर्गिक ओढे अतिक्रमणमुक्त करून त्यांची स्वच्छता करणे, नाल्यांची नियमित साफसफाई, आवश्यक ठिकाणी मोठ्या क्षमतेच्या गटार लाईन उभारणे, पावसाच्या पाण्याचा सुरळीत निचरा होईल, अशा दीर्घकालीन नियोजनाची अंमलबजावणी करणे तसेच संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पूरस्थितीनंतर साथीच्या आजारांचा धोका लक्षात घेऊन शहरात औषध व जंतुनाशक फवारणी, विशेष स्वच्छता मोहीम आणि आवश्यक आरोग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. दरम्यान, पूरग्रस्त नागरिकांच्या नुकसानीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी महसूल विभागामार्फत पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. या कामासाठी चाकण नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना पूर्ण सहकार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जेणेकरून नागरिकांना शासकीय मदत लवकरात लवकर मिळू शकेल.

पूरामुळे शहरातील विविध भागांत वाहून आलेला गाळ, कचरा आणि साचलेली घाण तातडीने हटविण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर काम करून रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि पूरग्रस्त परिसर स्वच्छ केले असून, शहर पूर्ववत करण्याचे काम वेगाने सुरू आहे.